www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
# दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 294 | बुधवार दि. 09 जुलै २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

## पुण्याच्या गणेशोत्सवातील डीजेसंदर्भात सर्वात मोठा निर्णय

### पुनीत बालन म्हणाले, 'डीजे वाजवणाऱ्या गणेश मंडळांना...'



हा दिवस उत्साहात हा सण साजरा करतात. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा पुण्यातूनच पुढे गेली. शहरातील कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम यांसारख्या मंडळांचे गणपती विशेष प्रसिद्ध आहेत. पुण्यात विसर्जन मिरवणुकीत मोठी गर्दी जमते, पण शिस्तबद्ध नियोजनामुळे दुर्घटना टळतात. यंदा पर्यावरणपूरक सणासाठी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर दीर्घकालीन धोरणासोबतच डीजेमुक्त गणेशोत्सवाची देखील चर्चा सुरु आहे. पुनित बालन यांनी यासंदर्भात मोठा निर्णय घेतलाय.

**पुण्याचा जगप्रसिद्ध गणेशोत्सव**

पुण्याचा भव्य आणि ऐतिहासिक गणेशोत्सव आता फक्त शहरापुरता मर्यादित न राहता जगभर प्रसिद्ध झालाय. हा उत्सव धार्मिक रूढी आणि सांस्कृतिक परंपरेनुसार साजरा केला पाहिजे, या उद्देशाने यावर्षी डीजे वाजवणाऱ्या गणेश मंडळांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत किंवा जाहिरात दिली जाणार नाही, असे 'पुनीत बालन ग्रुप'चे अध्यक्ष पुनीत बालन यांनी स्पष्ट केले आहे. 'समर्थ प्रतिष्ठान'च्या ढोल-ताशा पथकाच्या संगीतमय पूजा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

**132 वर्षांहून अधिक काळापासून परंपरा**

'पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा 132 वर्षांहून अधिक काळापासून सुरू आहे. स्वातंत्र्यलढ्यादरम्यान लोकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने लोकमान्य टिळक आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. स्वातंत्र्यानंतर या उत्सवाच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे पुनित बालन म्हणाले. पण अलिकडच्या काळात काही मंडळे मोठे स्पीकर लावून त्यावर अश्लील गाणी वाजवून उत्सव साजरा करतात. ज्यामुळे गणेशोत्सवाचे पावित्र्य बिघडते आणि ते आपल्या संस्कृतीला अनुसरून नाही. अशा परिस्थितीत आता डीजेमुक्त गणेशोत्सवाच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची वेळ आल्याचे पुनीत बालन म्हणाले.

**धार्मिक आणि पारंपारिक पद्धतीने सण साजरे**

पुण्यातील सार्वजनिक गणेश मंडळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी, माणिकचंद ऑक्सिरिच आणि पुनीत बालन ग्रुप जाहिरातींच्या स्वरूपात मोठी आर्थिक मदत करत असतात. पुण्याचा गणेशोत्सव पाहायला जाणाऱ्यांना रस्त्याच्या दुतर्फा जाहिरातदारांचे बॅनर पाहायला मिळतात. डीजेवर आक्षेपार्ह गाणी वाजवून बाप्पाचे पावित्र्य भंग करणाऱ्या मंडळांना यापुढे कोणतीही मदत दिली जाणार नाही, असे आता स्पष्ट करण्यात आले आहे. आपल्या हिंदू देवी-देवतांचे उत्सव धार्मिक आणि पारंपारिक पद्धतीने साजरे केले पाहिजेत. त्यांच्या ठाम भूमिकेचे समाजातील सर्व घटकांकडून स्वागत केले जात आहे.

**कोण आहे पुनित बालन ?**

पुनित बालन हे एक प्रसिद्ध उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते आहेत. पुण्याच्या गणेशोत्सवात त्यांचा सक्रिय सहभागी असतो. त्यांच्या पुनित बालन ग्रुपतर्फे अनेक गणेश मंडळांना प्रायोजकत्व आणि सहकार्य देण्यात येते. विशेषतः पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी ते शाडू मूर्तींच्या निर्मितीला प्रोत्साहन देत असतात याशिवाय त्यांच्या सामाजिक संस्थांमार्फत गरजूंना अन्नदान आणि वैद्यकीय मदत यासारखे उपक्रम गणेशोत्सवात राबवले जातात. बालन यांनी गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्वाला बळकटी देण्यासाठी मंडळांसोबत दीर्घकालीन भागीदारी केल्याचे दिसते.

## वाढदिवसानिमित्त दोन लाख रुपयांचे शालेय शैक्षणिक साहित्य वाटप

### अंबादास धूळे मित्र मंडळ पोफाळी यांचा नावीन्यपूर्ण उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी /**
**राजू गायकवाड**

उमरखेड तालुक्यातील समाजसेवक अंबादास धूळे यांच्या संकल्पनेतून शाळेच्या गोर गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहीत्य व स्कुल बॅग दोन लाख रुपयांचे वाटप केली महागाई च्या काळात गरीब विद्यार्थ्याचे पालक शैक्षणीक साहित्य वेळेवर मिळत नाही त्यासाठी पोफाळी जिल्हा परिषदचे समाजसेवक अंबादास धूळे यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा चिली तांडा व अमानपूर तांडा येथील विद्यार्थी शिक्षण साहित्यापासून कोणीही वंचीत राहू नाही त्यांना शिक्षणासाठी **पान 4 वर**



> सध्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुले जास्त प्रमाणात शिक्षण घेत आहेत त्यांना शैक्षणिक साहित्य हे त्यांच्या फीस मधूनच मिळत असते परंतू ग्रामिण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणारे मुलांना आजही पुस्तकं पाटी ही थैल्या मध्ये घेऊन जावावं लागते त्यांना वही नसते त्यांना पुस्तकं नसते त्यामुळे माझ्या वाढदिवसानिमित्त अंबादास धुळे मित्रमंडळ यांच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे यामध्ये माझा खूप मोठा आनंद आहे.
> **अंबादास धूळे**
> **सामाजिक कार्यकर्ते**

## वाशीत भाजपाचं 'विद्यार्थी गुणगौरव व मार्गदर्शन शिबिर' उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्हा व डॉ. राजेश पाटील यांच्या पुढाकाराने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात भव्य 'विद्यार्थी गुणगौरव आणि मार्गदर्शन शिबिरा'चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दहावी आणि बारावी नंतर करिअर निवडताना मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने विद्यार्थ्यांना आणि पालकांना तज्ज्ञ मार्गदर्शक माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला माजी खासदार डॉ. संजीव गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, माजी महापौर जयवंत सुतार, माजी नगरसेवक अनंत सुतार, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष अनिल कौशिक, माजी नगरसेवक काशिनाथ **पान 4 वर**




## कोळसा वाहतुकीमुळे पिकांची होणारी नुकसानभरपाई

### ठरवण्यासाठी समिती गठीत-मंत्री शंभूराज देसाई

**दैनिक युवक आधार**
**मुंबई.संतोष पाटील**

कोळसा वाहतुकीमुळे होणाऱ्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानाच्या धोरणासाठी अपर मुख्य सचिव (मुख्यमंत्री सचिवालय) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यांमध्येही अशाच स्वरूपाच्या तक्रारी लक्षात घेता, मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून समिती गठीत करण्यात येईल अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य किशोर जोरगेवार यांनी प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री देसाई म्हणाले, कोळसा वाहतुकीमुळे होणारे पिकाच्या नुकसान भरपाईच्या संदर्भामध्ये यापूर्वी यवतमाळ जिल्ह्यातल्या काही तक्रारी प्राप्त झाल्यानंतर मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने अतिरिक्त मुख्य सचिव अतिरिक्त मुख्य सचिव मुख्यमंत्री सचिवालय यांच्या अध्यक्षतेखाली एक सहा सदस्यांची समिती यवतमाळ जिल्ह्यासाठी गठीत करण्यात आली. याच धर्तीवर चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांसाठी समिती गठीत करण्यात येईल. ही समिती तीन महिन्यात या नुकसान भरपाई संदर्भात विभागाला अहवाल सादर करेल या समितीचा अहवाल सादर करताना त्या क्षेत्रातील लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा देखील विचार करण्यात येईल.

## पिंपळस रामाचे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये

### बाल गोपाल विठ्ठलभक्तीने साऱ्यांचं लक्ष वेधलं..

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे
येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले. सर्वधर्म प्रेम,सहिष्णुता आणि शांततेचा संदेश देणाऱ्या या दिंडीने परिसर भक्तीरसात न्हाल्याचे दृश्य पाहायला मिळाले. "देव एकच आहे,त्याची नावे अनेक असू शकतात,पण मानवतेचा हात हाच श्रेष्ठ धर्म आहे," असा संदेश या दिंडीच्या माध्यमातून देण्यात आला. शाळेच्या बालगोपालांनी वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत सजून टाळ,मृदंग, लेझीम पखवाजाच्या गजरात विठ्ठलनामाचा जयघोष करत परिसर पंढरपूरमय केला. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने,नवनाथ बटवल,मनोज



दलाल,दिनेश पाटील,पोपट मोरे,प्रदीप पालवी उपशिक्षिका,लता जाधव,शीला कसबेकर,माधुरी सोनवणे,पल्लवी भडके,रंजना पैठणकर,जयश्री मोरे,मयुरी पंडित इत्यादी उपस्थित होते शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने यांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदाय,संत परंपरा व विठ्ठलभक्ती याविषयी माहिती दिली. क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांनी विठ्ठलाच्या तालावर लेझीम पथक पथकाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले
शाळेच्या लहानग्या विद्यार्थ्यांनी "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरि विठ्ठल", "माऊली माऊली" अशा भक्तीगीतांच्या जयघोषात परिसरात भव्य दिंडी काढली. विद्यार्थ्यांच्या निरागस चेहऱ्यावर झळकणारा भक्तीभाव,टाळ-मृदंगाच्या गजरात त्यांनी सादर केलेला उत्साह यामुळे संपूर्ण परिसरात आनंद आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले.
दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेची ओळख, सामाजिक ऐक्य, प्रेम, सहिष्णुता आणि एकोप्याचा संदेश देण्यात आला.

## जिवंत १०० के व्ही तारेच्या स्पर्शाने दगावल्या चार गायी

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी**
**उमेश साखरकर**

**दिग्रस** : तालुक्यातील इसापूर येथे शेतामध्ये चरत असताना गायींचा शेतातील अस्ताव्यस्त पडलेल्या १०० केव्हीच्या जिवंत विद्युत प्रवाहांच्या ताराला स्पर्श झाला. त्यामुळे विजेच्या तीव्र झटक्याने चार गायी ठार झाल्या. ही घटना दिग्रस तालुक्यातील इसापूर शेतशिवारात आज ७ जुलैला सोमवारी सकाळी ८:३०



वाजता घडली. प्रकाश राऊत असे या गायींच्या मालकाचे नाव आहे. सकाळी ७वाजता नेहमीप्रमाणे गायी चारायला घेउन गुराखी गेला होता. सकाळी ८:३० च्या सुमारास गायी चरत चरत शेतकरी मोहम्मद यांच्या शेतामध्ये पोहोचल्या. मात्र त्यांच्या शेतात १०० केव्हीच्या वीज वाहिणीच्या तारा वादळामुळे **पान 4 वर**

## सर्व धर्म प्रार्थना व मेडिटेशन स्थानचे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्‌घाटन व लोकार्पण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी**

आषाढी एकादशी रविवार 6 जुलै 2025 रोजी नील हॉस्पिटल येथे नवनिर्मित 'सर्व धर्म प्रार्थना व मेडिटेशन स्थान' याचे उद्‌घाटन व लोकार्पण माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमा साठी आमदार प्रशांत ठाकूर, डॉ. गिरीश गुणे, वाय टी देशमुख, डॉ कविता चोतमोल, चारुशीला घरत, प्रीतम म्हात्रे माजी विरोधी पक्ष नेते, राजश्री वावेकर, बीके डॉ शुभदा नील स्त्रीरोग कॅन्सर



व गर्भ संस्कार तज्ञ, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मंगला गडमुळे, डॉ.निलेश बांठिया, नील हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. पी बी नील, आर्किटेक नम्रता व इतर मान्यवर उपस्थित होते. सदा खुश रहने का फार्मूला' या विषयावर कारपोरेट ट्रेनर डॉ इ वी स्वामीनाथन यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. वैद्यकिय क्षेत्रात गेले अनेक वर्ष डॉ शुभदा नील मॅडम नविन पनवेल येथे स्थित नील हॉस्पिटल येथे अविरत सेवा देत आहेत. शरीरासोबत मनालाही बरं करण्याचा वसा गेले १५ वर्ष मेडिटेशन वर्गाद्वारे त्या करित आहेत. येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला इच्छा शक्तीचं औषध मिळावं याकरिता नील हॉस्पिटल येथील एक स्थान ध्यान धारणेकरिता लोकार्पण करण्यात आले. यावेळी रामशेठ ठाकूर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



सामाजिक कार्यकर्ता चिंचपाडा विलास भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी विलास भगत यांचा वाढदिवस केक कापून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले यावेळी उपस्थित असणारे जिल्हाप्रमुख सुनील गोवारी,करण शेळके , संकेत गायकवाड, प्रकाश जाधव, यावेळी खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी विलास भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आले

**( दैनिक युवक आधार )**

# पहेला ते चिखलपहेला या 2 किलोमीटर रस्त्याची दयनीय अवस्था

## खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा



**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** भंडारा तालुक्यातील पहेला कडून चिखलपहेला कडे जाणाऱ्या या 2 किलोमीटर रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला पाणी साचलेला आहे. खड्ड्यात रस्ता ती रस्त्यात खड्डा हेच कळत नाही .या रस्त्याने साधी टू व्हीलर, सायकल ,चालवणे कठीण आहे. रस्ता जागोजागी फुटलेला असून डांबरीकरण रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. जागोजागी खड्डे पडलेले आहेत. पाणी साचलेला आहे. आता जनतेने आपले वाहन कुठून चालवावे हेच त्यांना कळत नाही. या रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग ,जिल्हा परिषद अध्यक्ष, आमदार ,खासदार ,यांनी तात्काळ याकडे लक्ष देऊन नागरिकांना होणारी त्रास थांबवून ही समस्या तात्काळ मार्गी लावावी अशी सर्वसामान्य जनतेची मागणी आहे.

# रा.जि.प शाळा धोंडखार तर्फे बिरवाडी येथे शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**रोहा /रायगड**

ह्युबॅक सुदर्शन रोहा आणि क्लोरीअर स्टाफ यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले . गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळावे. यासाठी शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्ष स्टाफ असोसिएशन राजेंद्र मळेकर, उपाध्यक्ष संतोष बेले, सेक्रेटरी योगेश कुंभार ,खजिनदार शैलेश सकपाळ ,असोसिएशन कंपनीचे अधिकारी, कर्मचारी, युवा कार्यकर्ता सुदर्शन गावडे, युवा कार्यकर्ता सनी म्हात्रे, गडबल शाळेचे मुख्याध्यापक डोयले , शिक्षिका राजश्री अहिरे, खैराले शाळेचे मुख्याध्यापक डांगे, धोंडखार शाळेचे मुख्याध्यापक सुरेश भोईर , व शिक्षिका सुनीता भोये, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादेव मांडलेकर तसेच ग्रामस्थ या कार्यक्रमाला उपस्थित होते. मुख्याध्यापक सुरेश भोईर यांनी उपस्थित कंपनीचे अधिकारी कर्मचारी व युवा कार्यकर्ता,ग्रामस्थ यांचे आभार मानले.



**काळकथित यशोमाई सदाशिव मोहिते यांच्या 10 व्या स्मुर्तीदिनामित रुग्णांसाठी रुग्ण वाहिकेचे अणावरण रिपब्लिकन नेते मा. नरेंद्र गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.**



दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी

काळकथित यशोमाई सदाशिव मोहिते यांच्या 10 व्या स्मुर्तीदिनामित रुग्णांसाठी रुग्ण वाहिकेचे अणावरण रिपब्लिकन नेते मा. नरेंद्र गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. पनवेल ( प्रतिनिधी ) :- काळकथित यशोमाई सदाशिव मोहिते यांच्या 10 व्या स्मुर्तीदिनामित रुग्णांसाठी रुग्ण वाहिकेचे अणावरण रिपब्लिकन नेते मा. नरेंद्र गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.
रुग्णवाहिनी मार्फत अनेक गरजु लोकांना मदत होऊ शकते या अनुषंगाने गणेश मोहिते यांनी दुर्गा ऍम्ब्युलनस सर्व्हिस या नावाने देत आहेत.
आपल्या मातेच्या आठवणीं साठी समज्याच्या हितासाठी रुग्णवाहिनेचे अनावरण नरेंद्र गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर मा. विजय गायकवाड,गणेश मोहिते,महेश साळुंखे,हिरामण जोशी,सुनील गायकवाड, शैलेश गायकवाड. सिद्धार्थ मोहिते. उपस्थित होते.

# एक दिवस कोरडा दिवस पाळू हिवताप, डेंग्यू ,मलेरिया आजार टाळू

## साथरोग- किटकजन्य आजार टाळण्याकरिता काळजी घ्या : आयुक्त श्री.मंगेश चितळे यांचे नागरिकांना आवाहन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

हिवताप प्रतिरोध महिन्यांतर्गत जनजागृती
सध्या जोरदार पाऊस सुरू असून या दिवसांमध्ये डासांचे प्रमाण वाढत असते. त्यामुळे हिवताप, डेंगू ,मलेरिया सारख्या साथजन्य रोग होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवरती वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत किटकजन्य आजराविषयी खबरदारी घेण्यासाठी वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करुन नागरिकांनी पुरेशी घ्यावी असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे. सध्या महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने "हिवताप प्रतिरोध महिना" साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत शाळा, घरोघरी जाऊन, आरोग्य केंद्राच्या आसपासचा परिसर, बाजारपेठा, सोसायट्यांमध्ये हिवतापाची लक्षणे, उपचार व हिवताप प्रतिरोध अंतर्गत विविध उपाययोजनांची माहिती देण्यात येत आहे. पावसाळ्यात विविध किटकजन्य रोगाचे प्रमाण वाढत असते. अशा वेळी नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे. तसेच भाज्या,फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात. सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी ,डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहिरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे. अतिसार झाल्यास क्षार संजिवनी मिश्रणाचा वापर करावा. घरांतर्गत डास उत्पत्तीस्थाने टाळण्यासाठी घरातील फुलदाणी मनीप्लँट,वॉटरकूलर इत्यादीमधील पाणी आठवड्यातून एक दिवस पुर्णपणे काढून कोरडे करून 'कोरडा दिवस' पाळावा, अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे. जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले,ताजे अन्न खावे, रस्त्यांवरील उघडे अन्नपदार्थ खावू नये. ताप सर्दी, खोकला अशा प्रकारची लक्षणेअसल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

हिवताप,डेंगू, मेंदूज्वर, चिकनगुनिया,मलेरिया असे साथीचे रूग्ण आपल्या आसपास आढल्यास जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी किंवा रूग्णालयाशी संपर्क साधावा. रूग्णालयांनी, प्रयोगशाळांनी साथीच्या रोगाचे रूग्ण महापालिकेला IDSPPANVELCORPORATION@GMAIL.COM या ईमेलआयडीवरती कळवावे असे आवाहन वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.





# कल्याण शिळ रोडवरील प्रवासी ट्रॅफिक ने त्रस्त, ट्रॅफिक हवालदार मात्र वसुली करण्यात मस्त....

**दैनिक युवक आधार**
**कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**
**रमेश राऊत**

**शिळफाटा(ठाणे):-** शिळ फाटा ते मेट्रो मॉल (कल्याण) या १३ किलोमीटर प्रवासासाठी नागरिकांना दीड ते दोन तास घालवावे लागत आहे,येथील ट्रॅफिकची समस्या बहुतेक सर्कल वर आणि क्रॉसिंग वर व्यवस्थित नियोजन नसल्यामुळे होत आहे. प्रशासनाने आणि वाहतूक विभागाने प्रत्येक सर्कलवर आणि चौकात ट्रॅफिक हवालदारांसह वॉर्डन पण नियुक्त केले आहेत पण याचा उपयोग वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी होत नसून वसुलीसाठी होत आहे असे निदर्शनास येते. कल्याण फाटासर्कल,पलावा सर्कल, काटई चेक पोस्ट, काटई नाका सर्कल, घारिवली चौक, मानपाडा सर्कल, सोनार पाडा डीएनएस बँक चौक,रीजन्सी चौक, टाटा पावर चेक पोस्ट या सर्व ठिकाणी ट्रॅफिक हवालदार आणि त्यांच्यासोबत चार ते पाच वॉर्डन बॉईज सुद्धा असतात, पण ते वाहतूक कोंडी सोडवण्याऐवजी ट्रॅफिक मध्ये उभे असलेले दुचाकी स्वार,रिक्षा आणि तसेच मालवाहतूक करणाऱ्या गाड्या यांना मोबाईल द्वारे चेक करून जबरदस्तीने त्यांच्यावर कारवाई करीत असतात. काही ठिकाणी तर हे वॉर्डन बॉईज अर्ध्या रस्त्यामध्ये येऊन गाड्या अडवतानाचे निदर्शनास आले आहे. तसेच प्रत्येक चौकात आणि सर्कलवर पडलेल्या खड्ड्यांमुळे सुद्धा वाहनांना व्यवस्थित गती मिळत नसल्यामुळे सुद्धा वाहतूक कोंडी जास्त प्रमाणात होते सर्कलवर असणारे खड्डे प्रशासन जाणून बुजून बुजवत नाही कारण येथे गाड्यांचा वेग कमी होतो आणि वाहतूक हवालदारांना गाड्या पकडण्यात सोयीस्कर होते. कल्याण शिळ रोडवर शिळफाटा ते सुचक नाका चौक पर्यंत सात ते आठ चौक आणि सर्कल असून या सर्कलवर रीजन्सी सर्कल सोडला तर एकाही सर्कलवर सिग्नल यंत्रणा बसवण्यात आलेली नाही आणि जेथे बसवली आहे तिथे त्यांचा वापर होत नाही ट्रॅफिक होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे येथे होणारी मोठ्या प्रमाणात वसुली. मोटर सायकल स्वरांना शिळफाटा सर्कल ते कल्याण ला पोहोचेपर्यंत पाच ते सहा वेळा या ट्रॅफिक पोलिसांच्या जाचाला सामोरे जावे लागत आहे. या सर्व गोष्टी दिवसाढवळ्या आणि सर्वांच्या देखत होऊन सुद्धा कुठलाही सामाजिक कार्यकर्ता किंवा राजकारणी या गोष्टींचा विरोध का करीत नाही याबद्दलचा मोठा प्रश्नचिन्ह या रोडवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या मनात निर्माण झाला आहे.



# आजीवली येथील श्री परशुराम माळी यांना राज्यस्तरीय जगदगूरू संत तुकाराम महाराज पुरस्कार जाहीर!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

आजीवली तालुका पनवेल येथील श्री परशुराम नथुराम माळी गेली २५ वर्षे सामाजिक व वारकरी संप्रदायात काम करीत आहेत. आजीवली येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज सेवा मंडळ आजीवली येथे न भूतो न भविष्य असे तत्पुरती धार्मिक कार्य केले आहे. धार्मिक कार्यात आपला मोठा सहभाग असल्यामुळे आपणास ह. भ. प. श्री परशुराम नथुराम माळी या नावाने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे ह.भ. प. नामदेव महाराज शास्त्रीजी यांनी कौतुकाची थाप दिली आहे. आजिवली हे गाव संतांची भूमी असलेले गाव आहे.आपण काही काळ आजीवली येथील सरपंच असताना सामाजिक व शैक्षणिक अडचणी सोडवून गावाला एक वेगळी दिशा देण्याचे काम केले आहे. गोरगरीब जनतेला अडचणीच्या काळात मदत केली आहे. आपण धार्मिक कार्यात मदतीचा हात नेहमीच पुढे असतो. आपण चांगल्या कामात नेहमीच पुढाकार असतो. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक कला महोत्सव २०२५ मध्ये ३ ऑगस्ट रोजी टाऊन हॉल ,उल्हासनगर ठाणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारामध्ये आजीवली तालुका पनवेल येथील *श्री परशुराम नथुराम माळी* यांना *लोकशाहीर अण्णाभाऊ साठे २०२५ मध्ये होणाऱ्या महोत्सवा मध्ये जगदगूरू संत तुकाराम महाराज पुरस्कार या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी राज्यातील अनेक राजकीय मंडळी, सामाजिक मंडळी ,सिने अभिनेते ,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे श्री परशुराम माळी यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



# नंदुरबारमध्ये अयोग्य दर्जाचे खाद्यतेल प्रकरणात

## दोषींवर कारवाई करण्यात येणार

**....मंत्री नरहरी झिरवाळ**
**दैनिक युवक आधार**
**मुंबई.संतोष पाटील**

नंदुरबार जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाने (FDA) केलेल्या तपासणीत काही खाद्यतेल नमुने अयोग्य दर्जाचे आढळून आले असून, याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येणार असून संबंधित कंपनी बंद करण्याची कार्यवाही केली जाईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य आमश्या पाडवी यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य समीर कुणावार, हिरामण खोसकर यांनीही उपप्रश्न उपस्थित केला. १० मार्च २०२५ रोजी अक्कलकुवा येथील मे. गोपाल प्रोव्हिजन या आस्थापनाची तपासणी करताना महिका ब्रँडचे रिफाईन्ड सोयाबीन तेल व कमला ब्रँडचे शेंगदाणा तेल या अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. प्राप्त झालेल्या प्राथमिक अहवालानुसार हे नमुने अन्न सुरक्षा मानकांनुसार अप्रमाणित आढळले. विक्रेत्याने अपील केल्यामुळे नमुने फेरविश्लेषणासाठी सेंट्रल फूड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिट्यूट, मैसूर येथे पाठविण्यात आले आहेत. सन २०२४-२५ या कालावधीत नंदुरबार जिल्ह्यात खाद्यतेलाचे एकूण १२ नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी ५ नमुने अयोग्य दर्जाचे घोषित करण्यात आले आहेत. त्यातील २ प्रकरणांमध्ये अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत कारवाई सुरू असून उर्वरित ३ नमुने रेफरल प्रयोगशाळेकडून तपासणी अहवालाच्या प्रतीक्षेत आहेत. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलली जातील असे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी यावेळी सांगितले.

# रयत शिक्षण संस्थेसाठी स्व. माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांचे मोठे योगदान- खासदार शरदचंद्र पवार, माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे रोपटे रायगड जिल्ह्यात आणून या रोपट्याचे वटवृक्ष करण्याचे काम स्व.मा. आम.दत्तूशेठ पाटील आणि त्यांचे सहकारी स्व. जनार्दन भगत,स्व.दि.बा. पाटील यांनी केले. असे प्रतिपादन देशाचे माजी कृषिमंत्री आणि खासदार शरद पवार साहेब यांनी केले ते ८ जुलै २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता नावडे येथे प. जो. म्हात्रे हायस्कूल आणि आत्माराम धोंडु म्हात्रे जूनियर कॉलेजच्या पटांगणामध्ये माजी आमदार तथा रयत शिक्षण संस्थेचे माजी उपाध्यक्ष स्व.दत्तूशेठ पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर शेकाप चे सरचिटणीस जयंत भाई पाटील, सांगोल्याचे आमदार बाबासाहेब देशमुख, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नातू आणि रयत चे संघटक अनिल पाटील, माजी आमदार दत्तात्रय सावंत, श्रीकांत देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. शरद पवार साहेब पुढे म्हणाले दत्तूशेठ पाटील आणि आमचे घरोब्याचे संबंध आहेत, आम्ही दोघांनीही विधिमंडळामध्ये काम केले आहे. दत्तूशेठ पाटील यांचा वारसा बाळाराम पाटील त्याच निष्ठेने चालवत आहेत. दहा वर्षांपूर्वी रयत शिक्षण संस्थेच्या कोकण विभागाची जबाबदारी बाळाराम पाटील यांच्यावर सोपवली गेली असून ते आज पर्यंत मोठ्या निष्ठेने पार पडत आहेत.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत असताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले विधिमंडळामध्ये अजित दादांच्या सोबत रोहित दादांच्या सोबत काम करता आलं सुप्रियाताईंच मार्गदर्शन लाभलं आणि त्यांच्या सोबत काम करता आलं दोन पिढ्यांची ही वाटचाल निश्चितपणाने माझ्या या आयुष्याला वेगळं वळून घेऊन गेले आणि कामाच्या बाबतीत आपण किती काम करू शकता याची जाणीव माझ्यासारख्या कार्यकर्त्याला आपला दिनक्रम बघितल्यानंतर मिळाली. आपल्या आदर्शावर काम करण्याचा प्रयत्न आम्ही मंडळी करतोय अनेक राजकीय स्थित्यंतरे या ठिकाणी शेतकरी कामगार पक्षाला पहावी लागतायत पण तात्यांच्या आयुष्याच्या सारीपाट सामोरा आणला की माझ्यासारखा कार्यकर्ता मनाने तयार होतो की किती त्रास झाला तरी पक्ष सोडणार नाही. तात्यांनी दिलेली कार्य संस्कृती सोडणार नाही आणि त्यांच्या आदर्शावर काम करण्याचा प्रयत्न मी शिक्षण क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात निश्चितपणे करीत आहे. शेतकरी कामगार पक्षाचे आमचे जयंत पाटील आणि जिल्ह्यातील तालुक्यातील कार्यकर्ते या संकटकाळी माझ्या पाठीशी उभे आहेत याचमुळे मला काम करण्याची ऊर्जा मिळते.

यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार जयंत पाटील यांनी सांगितले पाटील हे सभागृहामध्ये नेहमी शांत असत पण जेव्हा बोलत ते मार्मिक बोलत असे. ते पुढे म्हणाले मी पवार साहेबांचा खूप आभारी आहे कारण त्यांनी या भागात रयत शिक्षण संस्थेची शाखा उभारण्यास मदत केली त्याकडे रायगड जिल्ह्यात फक्त कोकण एज्युकेशन सोसायटीच होती. ते पुढे म्हणाले रयत शिक्षण संस्थेसाठी पनवेल मधील रामशेठ ठाकूर यांचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रात जर खऱ्या अर्थाने फुले शाहू आंबेडकर यांचे विचार रुजवायचे असतील तर शरद पवार साहेबांपेक्षा दुसरा पर्याय नाही. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी सांगितले रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था असून महाराष्ट्रावर त्याच्या शाखा आहेत. आणि या सर्व विभागात आणि सर्व क्षेत्रात रायगड विभागाचा प्रथम क्रमांक लागतो.



# स्वस्त धान्य दुकानदारांचे कमिशन गेल्या सहा महिन्यांपासून थकीत: दुकानदार आर्थिक अडचणीत

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**

**किनवट,दि.८:** राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत तालुक्यातील २०१ स्वस्त धान्य दुकानदारांचे कमिशन गेल्या सहा महिन्यांपासून थकीत आहेत. त्यामुळे हे दुकानदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. केंद्र सरकारच्या अन्नसुरक्षा योजनेतून अंत्योदय व प्राधान्य शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य दिले जाते. या वितरणासाठी दुकानदारांना प्रतिक्विंटल १५० रुपये कमिशन मिळते. मात्र, जानेवारी २०२५ पासून सर्वच दुकानदारांचे कमिशन थकले आहे.महिन्याच्या ५ तारखेला सर्व योजना मार्जिन थेट खात्यात जमा करावे, अशी मागणी वेळोवेळी निवेदनाद्वारे करण्यात आली.

**||वाढीव मार्जिनही नाही||**

शासनाने १५ एप्रिल रोजी मार्जिन १५० वरून १७० रुपये करण्यास मान्यता दिली होती. मात्र, हा निर्णय अद्याप अंमलात आलेला नाही.

**||आर्थिक ताण वाढतोय||**

दुकानदारांना धान्य वितरणासोबतच ई-केवायसी, आधार सिडिंग, मोफत साडी वाटप, ई-पॉस मशीन हाताळणे अशी कामे करावी लागतात. मात्र, वेळेवर कमिशन न मिळाल्याने आर्थिक ताण वाढत असल्याचे दुकान चालक सांगत आहेत.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# केनडियर चे नवी मुंबई वाशी मध्ये नवीन दालन सुरू

## केनडियरच्या नवी मुंबईतील 8व्या शोरूमने ब्रँडच्या रिटेल विस्ताराच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला

**दैनिक युवक अधव**
**नवी मुंबई प्रतिनिधी**
, ८ जुलै २०२५ : आधुनिक आणि ट्रेंड-आधारित डिझाईन्ससाठी प्रसिद्ध असलेला कल्याण ज्वेलर्सचा लाइफस्टाइल ज्वेलरी ब्रँड केनडियरने नवी मुंबईतील वाशी या गजबजलेल्या व्यावसायिक हबमध्ये आपले नवे रिटेल शोरूम सुरू केले आहे. सेक्टर 30A, प्लॅटिनम टेक्नो पार्क येथे असलेले हे नवे शोरूम मुंबईतील केनडियरचे 8वे शोरूम आणि देशातील 79वे शोरूम ठरले आहे. आजच्या चोखंदळ ग्राहकांसाठी स्टायलिश आणि सहज उपलब्ध दागिन्यांसाठी असलेली त्यांची बांधिलकी यातून अधोरेखित होते. ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून शाहरुख खानची घोषणा झाल्यानंतर लगेचच



या वाशी शोरूमचे उद्घाटन होत असून केनडियरच्या मजबूत विस्तार धोरणातील आणखी एक टप्पा म्हणून हे महत्त्वाचे पाऊल आहे. नवी मुंबईतील वाशी हे कॉर्पोरेट, रिटेल आणि लाइफस्टाइल ग्राहकांचं उत्कृष्ट मिश्रण असलेलं ठिकाण असल्याने केनडियरच्या ओम्निचॅनेल ब्रँड म्हणून वाढीसाठी हे परिपूर्ण स्थान ठरतं. केनडियर ब्रँड आपल्या हलक्याफुलक्या आणि बहुपयोगी दागिन्यांसाठी ओळखला जातो. जेन झी, काम करणारे व्यावसायिक आणि फॅशन-प्रेमी पुरुषांमध्ये हा ब्रँड विशेषतः लोकप्रिय आहे. किफायतशीर किंमतींसह समकालीन, आधुनिक व ट्रेंड-आधारित डिझाईन्सवर लक्ष केंद्रित करून, केनडियर ग्राहकांना त्यांची वैयक्तिक स्टाइल सहजपणे दाखवण्याची संधी देते. हे कलेक्शन्स गिफ्टिंगसाठीही उत्तम पर्याय ठरत असून खास क्षण साजरे करण्यासाठी आदर्श आहे. या नव्या शोरूमच्या उद्घाटनानिमित्त केनडियरकडून खास ऑफर्स दिल्या जात आहेत. वाशी, नवी मुंबईतील या नव्या स्थानासह, केनडियर डिजिटल सोयीसुविधा आणि प्रत्यक्ष अनुभव यांचं परिपूर्ण मिश्रण देण्याची आपली परंपरा पुढे सुरू ठेवत आहे. डिजिटल-फर्स्ट ब्रँड असूनही वाढत्या रिटेल उपस्थितीद्वारे ग्राहकांना अधिक सखोल अनुभव देण्याचा प्रयत्न करत आहे. कल्याण ज्वेलर्सची विश्वासार्हता आणि परंपरा यांचे पाठबळ असलेला केनडियर ब्रँड, दागिन्यांची खरेदी अधिक स्मार्ट, सुलभ आणि अनुभवात्मक बनवत आहे.

## गुरुकुल एज्युकेशन ट्रस्टचे विजयी सेलिब्रेशन, 125 विद्यार्थ्यांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
अंजनी सराफ आयोजित गुरुकुल एज्युकेशन आणि कल्चरल ट्रस्टद्वारे पनवेल मध्ये आयोजित विजयी सेलिब्रेशन 2025 कार्यक्रमात 125 विद्यार्थ्यांना पुरस्कृत आणि सन्मानित करण्यात आले. यावेळी सन्मानित करण्यात आलेले सर्व विद्यार्थी नृत्य प्रतियोगिता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर परफॉर्मन्स केलेले आहेत. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या विशेष कार्यक्रमादरम्यान विजेत्या कलाकारांना ट्रॉफी आणि पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पाच वर्षांचा कुशल या प्रतियोगिता मध्ये विजेता झाला. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, डान्स कोच मास्टर युसूफ हुसेन, रीना दलाल, नाजनीन पालेकर, पूजा बनसोडे, पद्मा सराफ, अनंत सराफ यांच्यासह शिक्षा आणि कलाक्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. त्यांनी या विद्यार्थी व अनेक कलाकारांना पुरस्कारीत केल्यामुळे त्यांचे अभिनंदन केले.




## पनवेलमध्ये कोणत्याही थिएटरमध्ये उदयपूर फाइल्स लावण्यात येवू नयेत

### रिपब्लिकन सेनेचे पनवेल शहर पोलीस ठाण्याला निवेदन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :**
शुक्रवारी होणाऱ्या उदयपूर फाइल्स या चित्रपटाला पनवेल मध्ये कोणत्याही थेटरमध्ये लावू नये त्यासाठी रिपब्लिकन सेना याने तीव्र विरोध केला आहे आणि त्याचे निवेदन पनवेल शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना देण्यात आले.
त्यावेळी निवेदन देताना रिपब्लिकन सेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संतोष दादा पवार रिपब्लिकन सेनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोफियान मुकादम, रायगड सरचिटणीस पंचशील शिरसाठ, रायगड जिल्हा संघटक सुशील जाधव, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष शोएब खलिफा, पनवेल तालुका अध्यक्ष सलमान मुकादम, पनवेल शहराध्यक्ष आरिफ राऊत आदी कार्यकर्ते निवेदन देताना उपस्थित होते.

## सातबाऱ्यावरील नोंदीसाठी लाच मागणारा महसूल सहाय्यक गजाआड..

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी**
**- अनिकेत मोहित**
श्रीवर्धन तहसीलदार कार्यालयात सातबाऱ्यावरील प्रलंबित नोंदणीचे काम करून देण्याकरिता रुपये 15000/- ची लाच मागणाऱ्या महसूल सहाय्यक विकास मनोहर बोंडले यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे..तक्रारदार शेतकरी याच्याकडे लाचखोर कर्मचाऱ्याने नोंदणीच्या कामाकरीता लाच मागितल्याची तक्रार शेतकऱ्याने मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली होती.. तक्रारीनुसार संबंधित अधिकाऱ्याने कामाकरीता 15000/- रुपयेची लाच घेतल्याचे निष्पन्न झाले आहे.. लाचखोर महसूल सहाय्यक विकास बोंडले यावर श्रीवर्धन पोलिस ठाणे जिल्हा रायगड येथे गुन्हा नोंद करण्याची कारवाई चालू असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी दिली आहे..

## पनवेल तालुका पत्रकार क्लब च्या माध्यमातून महापालिकेच्या हुतात्मा हिरवे गुरुजी शाळेत शालेय शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :**
पनवेल तालुका पत्रकार क्लबच्या माध्यमातून पनवेल महापालिकेच्या हुतात्मा हिरवे गुरुजी शाळेतील विद्यार्थ्यांना आज दिनांक 8 जुलै रोजी 'शालेय शैक्षणिक साहित्य' वाटप करण्यात आले. पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' च्या प्रभाग अधिकारी सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे उपाध्यक्ष तृप्ती पालकर खजिनदार राकेश पितळे, ,ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी संजय कदम सुमंत नलावडे, अनिल भोळे, राजेंद्र पाटील ,वर्षा कुलकर्णी व इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने म्हणाल्या माझेही शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले आहे. त्यामुळे या शाळांशी माझे भावनिक नाते आहे. महापालिकेच्या दगडी शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी खूप कष्ट घेत आहेत. पनवेल तालुका पत्रकार क्लबच्या माध्यमातून स्तुत्य उपक्रम राबविला आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.समारोपप्रसंगी पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे म्हणाले, प्रेस क्लबच्यावतीने आम्ही विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबवित असतो. या कामांच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहचण्याचा आम्ही प्रयत्न करत असतो. दगडी शाळेचा मोठा इतिहास आहे. या शाळेमधून अनेक मोठी माणसे घडली आहेत. हीच परंपरा अजूनही या शाळेने पुढे सुरू ठेवली आहे. या शाळेसाठी कोणतीही मदत आवश्यक असल्यास आम्ही नेहमी तुमच्या पाठीशी राहू असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.या कार्यक्रमाची सुरूवात विद्यार्थ्यांच्या स्वागत गीताने करण्यात



आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुजीत म्हात्रे यांनी सर्वांचे स्वागत करून, शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती विषयक माहिती दिली. पनवेल तालुका पत्रकार क्लबच्या माध्यमातून देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्यचा शाळेतील विद्यार्थ्यांना उपयोगी पडणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपशिक्षक वैभव पाटील यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षकवर्ग कमल तायडे, वैशाली सावळे, अर्चना माने, स्वाती पाटील उपस्थित होते.

## 'शूरवीर अग्निशामक' शुभांगी घुले यांची जागतिक पातळीवर आणखी एक चमकदार कामगिरी

### अल्बामा (अमेरिका) येथे जागतिक पोलिस व अग्निशमन स्पर्धा २०२५ मध्ये रौप्य पदकांची कमाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :**
"जिद्द असेल तर काहीही अशक्य नाही" हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील धाडसी महिला कर्मचारी शुभांगी संतोष घुले यांनी! अमेरिकेतील अल्बामा येथे नुकत्याच पार पडलेल्या 21 व्या जागतिक पोलिस व अग्निशमन स्पर्धा 2025 मध्ये शुभांगी यांनी फायर स्टेअर रेस सांघिक गटांत रौप्य पदक पटकावले आहे. याच स्पर्धेत मागील आठवड्यात "अल्टिमेट फायर फायटिंग चॅलेंज" या खेळात कांस्य पदक मिळवून भारताचे नाव उज्ज्वल केले होते,आता पुन्हा याच स्पर्धेत 'फायर स्टेअर रेस'मध्ये सांघिक स्पर्धेमध्ये रौप्य पदक मिळवले आहे. तसेच 'फायर फायटिंग चॅलेंज' स्पर्धेत चौथे तर 'फायर स्टेअर रेस वैयक्तिक स्पर्धेमध्ये पाचवे स्थान पटकावले आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ५० पेक्षा अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. उच्च दर्जाची व्यावसायिक चाचणी घेणाऱ्या या स्पर्धेत शुभांगी यांनी तडफदार, वेगवान आणि अचूक कामगिरी करत जागतिक पातळीवर भारताचा तिरंगा उंचावला.या ऐतिहासिक कामगिरीबद्दल पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री.मंगेश चितळे यांनी "शुभांगीसारख्या कर्मचारीवर्गामुळे महापालिकेचा गौरव वाढतो आहे." अशा शब्दांत त्यांचे कौतुक केले आहे. तसेच, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, व इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही त्यांचे मनापासून अभिनंदन केले आहे.पनवेल महापालिकेने दिलेल्या पाठिंब्यामुळे जागतिक व्यासपीठावर झळकलेली ही जिद्द आणि परिश्रमाची ज्योत – शुभांगी घुले – नव्या पिढीसाठी एक आदर्श ठरत आहे.




## पनवेलमध्ये कोणत्याही थिएटरमध्ये उदयपूर फाइल्स लावण्यात येवू नयेत रिपब्लिकन सेनेचे पनवेल शहर पोलीस ठाण्याला निवेदन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :**
शुक्रवारी होणाऱ्या उदयपूर फाइल्स या चित्रपटाला पनवेल मध्ये कोणत्याही थेटरमध्ये लावू नये त्यासाठी रिपब्लिकन सेना याने तीव्र विरोध केला आहे आणि त्याचे निवेदन पनवेल शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना देण्यात आले.
त्यावेळी निवेदन देताना रिपब्लिकन सेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संतोष दादा पवार रिपब्लिकन सेनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोफियान मुकादम, रायगड सरचिटणीस पंचशील शिरसाठ, रायगड जिल्हा संघटक सुशील जाधव, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष शोएब खलिफा, पनवेल तालुका अध्यक्ष सलमान मुकादम, पनवेल शहराध्यक्ष आरिफ राऊत आदी कार्यकर्ते निवेदन देताना उपस्थित होते.

# खारघरमध्ये एका रात्रीत नऊ घरफोड्या; भयमुक्तीसाठी पोलिसांनी सहकार्याची भुमिका घ्यावी

## गृह खात्याने लक्ष देण्याची आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
चोरी आणि घरफोडीच्या अनुषंगाने लोकांना भयमुक्त करण्याची गरज आहे अन्यथा पोलिसांवरील विश्वास उडेल, त्यासाठी गृह खात्याने लक्ष द्यावे अशी, मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत केली. विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात २०२५-२६ गृह विभागाच्या पुरवणी मागणीच्या अनुषंगाने बोलताना खारघर मध्ये एका रात्रीत नऊ घरात झालेल्या चोरीसंदर्भात पोलिसांकडून नागरिकांना होणाऱ्या वागणुकीचा दाखला देत आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिंता व्यक्त केली. यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले कि, पनवेल परिसरात लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. या वाढत्या लोकवस्तीमध्ये कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. विशेषत्वाने खारघर सारखे शहर आहे जे सर्व अत्याधुनिक सोयीसुविधायुक्त आहे. मात्र कायदा सुव्यवस्थेच्या अनुषंगाने अलिकडे वारंवार चिंताजनक प्रकार त्या ठिकाणी घडत आहेत. एका रात्रीत खारघरमधील वास्तुविहार मधील संस्कृती पाच आणि पारिजात सोसायटीतील चार घरांमध्ये असे एकूण नऊ ठिकाणी

खारघर शहरात एकाच रात्री ९ ठिकाणी घरे फोडून चोरटयांनी लाखोंचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली आहे.खारघर वास्तूविहार सेक्टर १६ येथील संस्कृती को.ऑप. हौ. सोसायटी या ठिकाणी बंद असणाऱ्या ५ घरामध्ये घरफोडय़ा झाल्या तसेच पारिजात को. ऑप हौ.सोसायटी या ठिकाणी ४ घरांमध्ये दि.३ रोजी मध्यरात्री ३ च्या सुमारास या घरफोड्या करण्यात आल्या आहेत. घरफोडी करण्यात आलेले बहुतांशी घरे बंद होती.विशेष म्हणजे चोरटयांचा याठिकाणी सर्रास वावर दिसत असल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.या परिसरात वारंवार घरफोड्या होत असताना पोलीस करतात काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

घरफोड्या झाल्या आहेत. पोलिसांनी हे सर्व गुन्हे एकत्रितपणे नोंद करून घेतले आहेत.पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर त्या ठिकाणी व्यवस्थित उत्तरे दिली जात नाहीत. त्यामुळे याचा तपास कशाप्रकारे तपास केला जाणार असा नागरिकांमध्ये संभ्रम आहे. पोलिसांकडून तक्रारदारांना योग्य उत्तर दिली जात नाहीत. मनुष्यबळ कमी आहे सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत असे तक्रारदारांना सांगितले जाते. विशेष म्हणजे सीसीटीव्ही कॅमेरामध्ये गुन्हेगार कॅप्चर झाले आहेत. त्यामुळे या गुन्हेगारांच्या शोधासाठी काय केले जात आहे याची माहिती पोलिसांनी तक्रादारांशी समन्वय करून दिले पाहिजे. सुरक्षा रक्षक सर्व ठिकाणी आहेत त्यांच्या बैठका झाल्या पाहिजेत तसेच भीती मुक्ततेसाठी पोलिसांनी नागरिकांना आश्वस्थ केले पाहिजे, आणि त्यासाठी गृह विभागाने लक्ष द्यावे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना मागणी केली.

# वाशीत भाजपाचं 'विद्यार्थी गुणगौरव व मार्गदर्शन शिबिर' उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्हा व डॉ. राजेश पाटील यांच्या पुढाकाराने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात भव्य 'विद्यार्थी गुणगौरव आणि मार्गदर्शन शिबिरा'चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दहावी आणि बारावी नंतर करिअर निवडताना मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने विद्यार्थ्यांना आणि पालकांना तज्ज्ञ मार्गदर्शक माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला माजी खासदार डॉ. संजीव गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, माजी महापौर जयवंत सुतार, माजी नगरसेवक अनंत सुतार, भाजपा प्रदेश




उपाध्यक्ष अनिल कौशिक, माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, शशिकांत राऊत, प्रकाश मोरे, डॉ. जयाजी नाथ, प्रदीप गवस, राजू शिंदे, प्राचार्या भाग्यश्री चौधरी, नगरसेविका अंजली वाळुंज, सायली शिंदे, समाजसेविका निर्मला पाटील, समाजसेवक कृष्णा पाटील, राजेश राय, दत्ता घंगाळे, युवा नेते ऋषिकेश काशिनाथ पाटील यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धर्माधिकारी यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन"व्यक्तिमत्व आणि करिअर घडवण्याची त्रिसूत्री म्हणजे – स्वतःला ओळखणं, योग्य क्षेत्र निवडणं आणि त्या क्षेत्रात आपली सर्वोत्तम क्षमता सिद्ध करणं. स्पर्धा परीक्षा म्हणजे केवळ नोकरी नव्हे, ती देशसेवेची संधी आहे," असं स्पष्ट करत धर्माधिकारी यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. "देशासाठी सच्चा अधिकारी बनणं हीच खरी देशभक्ती," असंही ते म्हणाले. भाजपाचा सामाजिक उपक्रमांना पाठिंबा"धर्माधिकारी सरांचे कार्य ही देशासाठी मूल्यांची शाळा आहे. अशा उपक्रमातूनच नवभारताचे शिल्पकार घडतात," अशी भावना माजी खासदार डॉ. संजीव गणेश नाईक यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजक डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांना योग्य दिशा आणि आत्मभान मिळावे यासाठी हे शिबिर आयोजित केले. ज्यांना राजकारणात येण्याची इच्छा आहे, अशा तरुणांचे भाजपा नेहमी स्वागत करेल." विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भाजपाची बांधिलकी या मार्गदर्शन शिबिरामुळे विद्यार्थी आणि पालक यांच्यात करिअर निवडीत आवश्यक ती जागरूकता निर्माण झाली. भाजपा नवी मुंबईत अशा उपक्रमांच्या माध्यमातून युवकांचे भवितव्य घडवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## अडसूळ गल्ली. चा नगर मधी एक कुत्रा महावितरण अनिल जैयस्वाल यांच्या हलगर्जी पणामुळे दगावला आहे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी नामदेव मंडपे**
**मंठा**
वाई गावातील आरसूळ गल्ली नगर मधील महावितरण अनिल जयस्वाल यांच्या अनेक वेळा डीपी जवळून केबल तुटून शिंदे यांच्या घरापर्यंत बार हमखास तुटत होतं सतत बिगड होत असल्यामुळे वारंवार फोन द्वारे एमसीबीच्या कर्मचाऱ्यांना सांगितले जात आहे पण कुठलेही कर्मचारी येऊन दुरुस्ती केली नाही उलट तारेच करंट खाली पडल्यामुळे कुत्रा चिटकून जागीच मूर्ती झाला आहे तर गावातील एखादा नागरिकाचा मृत्यू झाल्याच्या नंतर लाईट दुरुस्त करणार आहे का लाईटचे केबल पूर्णपणे खराब झालेले आहेत एजन्सी धारकाला फोन दारे विचारल्यास त्यांनी सांगितले की आम्हाला याबाबत कुठे ऑर्डर नाहीये त्यामुळे




आम्ही काम करू शकत नाही असे प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे महावितरण अभियंता व त्यांचे पांगरी कार्यालयास कळवुन ही कोणतीही पंचनामा केला नाही कोणी फोन घेत नाही महावितरण गावातील नागरिक मरण्याची वाट पाहत आहेत का संबंधित शेतकऱ्यास भरपाई तातडीने द्यावा अशी महावितरण वर अभियंता व संबंधित वर गुन्हा दाखल करा ग्रामपंचायत सदस्य कैलासराव निमट. ग्रामस्थांचं म्हणणं आहे मठपती साहेब तुम्ही वाई गावला लाईन मध्ये अशी ग्रामस्थांचे म्हणणे आहे

# खारघर परिसरात दारूबंदी करण्याबाबत विहित प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही -उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(प्रतिनिधी)**
खारघर परिसरात दारूबंदी करण्याबाबत विहित प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत विधानसभा सदस्य प्रशांत ठाकूर यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभेत बोलत होते.

मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडताना खारघर परिसरातील नागरिकांची दीर्घकाळाची दारूबंदीची मागणी, स्थानिक चळवळीचा इतिहास, आणि शासन यंत्रणेने आवश्यक ती कार्यवाही करावी, या मुद्द्यांवर त्यांनी सविस्तरपणे प्रकाश टाकला.आजच्या काळामध्ये खारघरची गणना ही अत्याधुनिक अशा पद्धतीच्या शहरांमध्ये होत आहे पण रस्त्यावरती असलेल्या या गावांमध्ये सगळ्यात पहिल्यांदा २००२ साली दारू विक्रीचा परवाना दिला गेला. त्या आधी या ठिकाणी कुठलाही दारूचा परवाना नव्हता आणि त्या अनुषंगाने दारू विक्रीचे त्या ठिकाणी दुकान नव्हते. २००२ साली या ठिकाणी पहिला परवाना दिला गेला होता आणि तेव्हापासून या दारू विक्रीला विरोध सुरू झाला. आणि त्यानुसार वेगवेगळ्या पद्धतीची निवेदन देत दारूबंदीच्या संदर्भामध्ये मागणी होत या ठिकाणी दारूबंदी झाली. आणि तसा ठरावही तत्कालीन खारघर ग्रामपंचायतीने केला. दारू विक्री सुरु होत आहे आहे कळताच दारूबंदीसाठी या ठिकाणी वेगवेगळ्या टप्प्यावरती या दारूच्या दुकानांच्या विरोधामध्ये आंदोलन होत राहिले आहेत. दारूबंदीसाठी राजकीय व सामाजिक संघटना




एकत्र येऊन संघर्ष नावाची संस्था स्थापन केली. आणि त्या अनुषंगाने संघर्ष संस्थेच्या माध्यमातून चळवळ उभी राहिली आणि या चळवळीचा इतिहास हा प्रचंड मोठा आहे आणि या माध्यमातून या ठिकाणी दारूच्या दुकानांवरती सातत्याने बंदीची मागणी होत आली. आतापर्यंत तीन हॉटेलला परवानगी मिळाली आहे त्यामध्ये स्वतःला फोर स्टार समजणारे एक हॉटेल, निरसूख पॅलेस, जेजे रसोई एवढ्यालाच त्या ठिकाणी आतापर्यंत परवानगी मिळाली आणि ती सुद्धा कायद्याचे पळवाटा शोधूनच त्या ठिकाणी त्यांनी परवानगी मिळवली या सगळ्याच्या विरोधामध्ये सातत्याने खारघरच्या नागरिकांनी संघर्ष केलेला आहे आणि त्यामुळे आता ज्या वेळेला एक वाईन शॉप हे थेट मुंबईतल्या परवानगी शिफ्ट करून खारघर मधील मोठ्या व मुख्य रस्त्यावरती देण्यात आले. आणि त्यामुळे लोकांच्या भावनांचा कडेलोट झालेला आहे. जर एखाद्या शहरातली लोकं ही दारूबंदी मागतात मात्र केवळ कायद्यातल्या पळवाटा का दाखवल्या जातात असा सवाल करत दारूबंदीसाठी योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे. आणि या संदर्भातील प्रक्रिया करण्यासाठी शासनाने पाठिंबा द्यावा, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचनेतून मागणी केली.

सन २००८ व २००९ च्या अधिसूचनेनुसार नगरपरिषद / महानगरपालिका क्षेत्रातील एखाद्या प्रभागातील २५ टक्के पेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण मतदारांनी लेखी निवेदन दिल्यास संबंधित जिल्हाधिकारी यथास्थिती गुप्त पद्धतीने मतदान घेण्याची प्रक्रिया पूर्ण करतील. जर संबंधित प्रभागातील एकूण मतदार किंवा महिला मतदारांच्या संख्येच्या किमान ५० टक्केपेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदार यांनी मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मतदान केल्यास त्या क्षेत्रात मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येतात, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ग्रामपंचायतीचे नगरपालिकेत किंवा महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर अनुज्ञप्ती संदर्भात कोणती कार्यवाही करावी यासंदर्भात शासनाने वेळोवेळी नियमांमध्ये बदल केले आहेत. १९७२ पासून राज्यात नवीन अनुज्ञप्तीची परवानगी देण्यात येत नाही. तथापि, विहित कार्यपद्धतीनुसार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्यास परवानगी देण्यात येते. मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्यासंदर्भात नगरपालिका किंवा महानगरपालिकेतील उपस्थित नागरिकांच्या नव्हे तर एकूण मतदारांच्या ५० टक्के पेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदारांचा निर्णय विचारात घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभा सदस्य अभिमन्यू पवार यांनी उपस्थित केलेल्या मुद्यास उत्तर देताना स्पष्ट केले.

## वाशीत भाजपाचं ‘विद्यार्थी गुणगौरव व मार्गदर्शन शिबिर’ उत्साहात संपन्न

**पान १ वरून** पाटील, शशिकांत राऊत, प्रकाश मोरे, डॉ. जयाजी नाथ, प्रदीप गवस, राजू शिंदे, प्राचार्या भाग्यश्री चौधरी, नगरसेविका अंजली वाळुंज, सायली शिंदे, समाजसेविका निर्मला पाटील, समाजसेवक कृष्णा पाटील, राजेश राय, दत्ता घंगाळे, युवा नेते ऋषिकेश काशिनाथ पाटील यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.धर्माधिकारी यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन“व्यक्तिमत्व आणि करिअर घडवण्याची त्रिसूत्री म्हणजे – स्वतःला ओळखणं, योग्य क्षेत्र निवडणं आणि त्या क्षेत्रात आपली सर्वोत्तम क्षमता सिद्ध करणं. स्पर्धा परीक्षा म्हणजे केवळ नोकरी नव्हे, ती देशसेवेची संधी आहे,” असं स्पष्ट करत धर्माधिकारी यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. “देशासाठी सच्चा अधिकारी बनणं हीच खरी देशभक्ती,” असंही ते म्हणाले.भाजपाचा सामाजिक उपक्रमांना पाठिंबा“धर्माधिकारी सरांचे कार्य ही देशासाठी मूल्यांची शाळा आहे. अशा उपक्रमातूनच नवभारताचे शिल्पकार घडतात,” अशी भावना माजी खासदार डॉ. संजीव गणेश नाईक यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजक डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, “विद्यार्थ्यांना योग्य दिशा आणि आत्मभान मिळावे यासाठी हे शिबिर आयोजित केले. ज्यांना राजकारणात येण्याची इच्छा आहे, अशा तरुणांचे भाजपा नेहमी स्वागत करेल.”

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भाजपाची बांधिलकी या मार्गदर्शन शिबिरामुळे विद्यार्थी आणि पालक यांच्यात करिअर निवडीत आवश्यक ती जागरूकता निर्माण झाली. भाजपा नवी मुंबईत अशा उपक्रमांच्या माध्यमातून युवकांचे भवितव्य घडवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## जिवंत १०० के व्ही तारेच्या स्पर्शाने दगावल्या चार गायी

**पान १ वरून** तुटून अस्ताव्यस्त पडून होत्या. गायी चरतचरत या ताराजवळ गेल्या असता त्यांचा स्पर्श झाल्याने विजेचा तीव्र झटका बसून चार गायी ठार झाल्या. सदर घटनेची माहिती गायीचे मालक प्रकाश राऊत यांनी इसापूरचे सरपंच गजानन गावंडे, पोलीस पाटील ओम खोडे यांना दिली. या घटनेत महावितरणच्या बेफिकीर कारभारामुळेशेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. सदर घटनेची माहिती सरपंचांनी महावितरणला दिली असून कर्मचाऱ्यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला आहे. विद्युत तारांमुळे जीवितहानीची शक्यता बळावली असून महावितरणने तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. महावितरणने गायीच्या मालकाला अंदाजे तीन लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सरपंच गावंडे यांनी केली आहे.

## अंबादास धूळे मित्र मंडळ पोफाळी यांचा नावीन्यपूर्ण उपक्रम

**पान १ वरून** साहित्य मिळाले पाहिजे ग्रामीण भागातील विद्यार्थी हा शहराच्या विद्यार्थ्याबरोबर गुणवतेत टिकला पाहिजे ग्रामीण भागातील विद्यार्थी वंचीत न राहीला पाहीजे यासाठी तरोडा गावाचे नागरीक व पोफाळी जिल्हा परिषद चे समाज सेवक अंबादास धूळे यांनी दोन लाख रुपयांचे साहीत्य वाटप करून गरीब विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे . त्यावेळी उपस्थीत गोपाल अग्रवाल, डॉ विठ्ठलराव चव्हाण , डॉ अनिल काळबांडे राहूल काळपांडे गणेश शिलार .अंबादास धूळे पूजा धूळे विकास मुटकुळे विष्णू मुटकुळे गणेश घोषे .अनिल सुरोशे रुस्तुमराव कदम विशाल राठोड रविकांत शिन्दे गजानन गरवारे देवानंद नरवाडे दता जारंडे बळीराम राठोड शुभाष नाईक युवराज जाधव कैलास राठोड गोविद कारभारी गजानन कारभारी रूपसिंग नसिंग शंकर थावरा सतिष राठोड विकास राठोड .अरविंद शिन्दे मोहन शिंदे सदाशिव ठाकरे शरद ठाकरे आदीजन उपस्थीत होते.

## आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा; रायगड जिल्हा परिषदेच्या खारघर, कोपरा, मुर्बी शाळांमध्ये उत्साहात

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)
महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशन आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या वर्ग अंतर्गत फेऱ्या रायगड जिल्हा परिषदेच्या खारघर, कोपरा, मुर्बी शाळांमध्ये उत्साहात पार पडल्या.

वक्तृत्व स्पर्धा म्हणजे विचार मांडण्याची, आत्मविश्वास वाढवण्याची संधी असून व्यासपीठावर बोलताना भीती कमी होते. त्याचबरोबरीने भाषा कौशल्य, मुद्देसूद विचार मांडणे, योग्य शब्द निवडणे शिकायला मिळते. तसेच इतर स्पर्धकांचे भाषण ऐकून नवीन दृष्टीकोन समजतात. मुद्दे अभ्यासून बोलल्याने सखोल वाचनाची आणि चिंतनाची सवय लागते. वक्तृत्वामुळे सामाजिक भान निर्माण होते. त्यामुळे हि वक्तृत्व स्पर्धा म्हणजेच विद्यार्थ्यांच्या कौशल्यात भर टाकणारी स्पर्धा आहे.
**- प्रवीण पाटील, अध्यक्ष, भाजप- खारघर मंडल**

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यु पाटील, नरेश ठाकूर, गुरुनाथ गायकर, अनिता पाटील, नेत्रा पाटील, आरती नवघरे, वासुदेव पाटील, शहर सरचिटणीस दिपक शिंदे, समीर कदम, रायगड जिल्हा महिला मोर्चा सरचिटणीस संध्या शारबिद्रे, दत्ता ठाकूर, किर्ती नवघरे, अमर उपाध्याय, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा साधना पवार, फुलाजी ठाकूर, युवा मोर्चा शहर अध्यक्ष नितेश पाटील, अक्षय लोखंडे, प्रवीण बेरा, आदित्य हातगे, हार्दिक पटेल, प्रथम पाटील, सार्थक दोरुगडे, मयूर घरत, योगेश पाटील, राहुल शिंदे, अनिकेत पाटील, ध्रुव गजरा, दिपक ठाकूर आदी उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आत्मविश्वासाने भाषणे सादर केली. "माझं शाळा", "माझं स्वप्न", "शिक्षणाचं महत्त्व", "स्वच्छ भारत" यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडले. स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये प्रेझेंटेशन स्किल्स, संवाद कौशल्य, आणि व्यासपीठावर आत्मविश्वासाने बोलण्याची क्षमता विकसित



होत आहे. ग्रामीण भागातील व शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अशा स्पर्धा म्हणजे स्वतःला व्यक्त करण्याची अमूल्य संधी ठरते. शाळेच्या मुख्याध्यापकांनीही स्पर्धा शाळेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरत असल्याचे सांगितले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांची तयारी करण्यास विशेष वेळ दिला. कोशिश फाउंडेशनच्या पुढाकाराने आणि पनवेल महानगरपालिकेच्या सहकार्याने शासकीय शाळांमध्येही अशा उपक्रमांची रचना होणे, ही शिक्षण क्षेत्रासाठी एक सकारात्मक पायरी आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना देणारी ठरत आहे. पुढील आंतर शालेय फेरीसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार असून विजेत्यांचे पुढील टप्प्यांत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

### सौम्या शर्मा चांडक यांनी अमरावती महानगरपालिका आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला

## मावळते आयुक्त सचिन कलंत्रे नेहमीच प्रयत्नशील राहिले

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**



अमरावतीचे महानगरपालिकेचे नूतन आयुक्त म्हणून सौम्या शर्मा ( चांडक ) यांनी महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून मावळते आयुक्त सचिन कलंत्रे यांच्याकडून पदभार स्विकारला यावेळी मावळते आयुक्त यांनी सचिन कलंत्रे यांनी त्यांचे स्वागत करीत पदभार सोपविला, मावळते आयुक्त सचिन कलंत्रे यांनी अमरावती महानगरपालिकेचा पदभार घेतल्यापासून नेहमीच प्रयत्नशील राहिले, शहरांतील विकास कामांना आणि सर्व सामान्य जनतेला त्यांनी प्रथम न्याय दिला. त्यांची बदली पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीमध्ये उपसंचालक म्हणून बदली झाली आहे. अमरावतीच्या नूतन आयुक्त सौम्या शर्मा (चांडक ) या २०१८ बॅचच्या तुकडीतील आयएएस अधिकारी आहेत. यापूर्वी त्या नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तर नागपूर सिटी प्रकल्पात सीईओ म्हणून कार्यरत होत्या. यावेळी नूतन आयुक्त पुढे म्हणाल्या... कायद्याच्या चाकोरीत राहून नागरिकांच्या समस्या लोकप्रतिनिधींचे प्रश्न गतिमान पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. आपण सर्वांनी एक नव्या उर्जेने गतिमान काम करणे अपेक्षित आहे. गती आणि चांगली कामगिरी या तीन गोष्टींवर प्रत्येकाने कार्य करावे अशी अपेक्षा नूतन आयुक्त सौम्या शर्मा ( चांडक ) यांनी व्यक्त केली आहे

## रामदास सेवाश्रम ट्रस्ट

रजि.नं.ई-८४४३/ठाणे,
पॉट नं. १६४४, वास्तुकार नगर, कल्याण कर्जत हायवे रोड, वांगणी-२, ता. अंबरनाथ, जि. ठाणे-४२१५०३.
मो.नं.९८५०८७९८२९ / ९४२३१०२७१३
EMAIL ID: PARAGBUVARAMDASHI13@GMAIL.COM

### निविदा सुचना

रामदास सेवाश्रम ट्रस्टतर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता परिसरातील व कीडा संकुलातील १३००० विद्यार्थ्यांकरिता खालीलप्रमाणे वस्तु खरेदी करावयाची आहेत व सेवापूरवठादारांची नेमणूक करावयाची आहे. त्यासाठी ही निविदा सुचना काढण्यात येत आहे.

| अन. | तपशील | संख्या | अंदाजे रक्कम | अन. | तपशील | संख्या | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शालेय गणवेश | 16 590 | 7080000 | 25 | कोलगेट पेस्ट व टूथब्रश | 75 900 | 1146000 |
| 2 | नाईट गणवेश | 625 | 162500 | 26 | गोदरेज साबण व वीर साबण | 107600 | 1418000 |
| 3 | स्पोर्ट गणवेश व ट्रॅक सूट | 16000 | 336100 | 27 | सॅनिटरी पॅड | 24050 | 116000 |
| 4 | शालेय टाय बेल्ट | 12 500 | 40700 | 28 | वॉशिंग पावडर लॉन्ड्री लिक्विड साहित्य | 400 | 36400 |
| 5 | स्वेटर रेनकोट | 4250 | 772000 | 29 | सरपंच जळगाव लाकूड | 10000 | 456500 |
| 6 | अंडरगारमेंट्स | 5600 | 292000 | 30 | हाउसकीपिंग व स्वच्छता साहित्य | 49 250 | 1642000 |
| 7 | शालेय वह्या | 155950 | 909850 | 31 | कर्मचारी गणवेश | 6000 | 1790500 |
| 8 | सायन्स जनरल संगणक पुस्तके व इतर छपाई | 15200 | 330325000 | 32 | सिव्हिल मेंटेनन्स मजुरी दर प्रमाणे काम वार्षिक | | 1750000 |
| 9 | शालेय पुस्तके बालभारती | 38 हजार | 700 | 33 | झेरॉक्स मशीन व प्रिंटर दुरुस्ती साहित्यासह मजुरी दराप्रमाणे वार्षिक देखभाल दुरुस्ती रेट कॉन्ट्रॅक्ट | | 250000 |
| 10 | शालेय पुस्तका एनसीआरटी | 10200 | 740500 | 34 | नवीन संगणक व प्रिंटर खरेदी पुरवठा | | 2500000 |
| 11 | शालेय पुस्तका नवनीत व इतर प्रकाशन | 550000 | 3938000 | 35 | आरोप आणि शुद्धीकरण मशीन साहित्य खरेदी | | |
| 12 | शालेय शूज | 6500 | 1699500 | 36 | ग्रंथालय पुस्तके | | 750000 |
| 13 | शालेय शूज डीएमएस | 650 | 197500 | 37 | सीसीटीव्ही कॅमेरा केबल व दुरुस्ती साहित्य | | 250000 |
| 14 | स्पोर्ट शूज | २६०० | 863500 | 38 | प्रसादाला करिता आवश्यक किराणा हवे तर साहित्य | | 4000000 |
| १५ | स्लीपर | 3250 | 184500 | 39 | स्कूल बस इतर वाहन स्पेअर पार्ट व दुरुस्तीसाठी पुरवठा दराची नियुक्ती | | 2000000 |
| 16 | शालेय सॉक्स | 22950 | 555000 | 40 | शालेय सॉफ्टवेअर व टेक्नॉलॉजी सेवा पुरवठादार | | 7500000 |
| 17 | मिलिटरी अक्सेसरीज | 2750 | 197500 | 41 | स्कूल व हॉटेल ऍक्टिव्हिटी उदाहरणार्थ संगीत कला अभिनव इत्यादी क्षेत्रातील सेवा पुरवठ्याची नियुक्ती | | 7500000 |
| 18 | टॉवेल रुमाल | 17 300 | 568500 | 42 | इलेक्ट्रिक मेंटेनन्स व नवीन इलेक्ट्रिक वर्क साहित्य खरेदी व सेवा पुरवठा दराची नियुक्ती स्पोर्ट शूज | | 1500000 |
| 19 | बेडशीट चादर सोलापूर | 9350 | 980000 | | | | |
| 20 | मच्छरदानी | 5100 | 4910000 | | | | |
| 21 | इतर वस्तू पॅकेज | 19350 | 590500 | | | | |
| 22 | स्कूल बॅग | 2500 | 589500 | | | | |
| 23 | स्टेशनरी एक लाख | 33850 | 18072119 | | | | |
| 24 | तेल पॅराशुट | 8450 | 154900 | | | | |

**एकूण 98009069**

**एकूण अंदाजे रकम 98009069 मात्र उक्त तक्त्यातील**
**प्रत्येक वस्तूसाठी स्वतंत्र निवेदा फॉर्म भरावा लागेल**
**ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया व निविदा भरण्याची इच्छा ऑनलाईन प्रक्रियेने पूर्ण केल्यावर भरलेल्या निविदा फॉर्म डाउनलोड करून बंद लिफाफ्यात समक्ष सादर करणे अनिवार्य राहील ज्या निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होणार नाही त्या प्रत्यक्ष खरेदी व भंडार विभाग कार्यालय वागणी जिल्हा ठाणे येथे उपलब्ध होतील.**

**अध्यक्ष**
**रामदास सेवाश्रम शैक्षणिक समिती**

**सरचिटणीस/अध्यक्ष**
**रामदास सेवाश्रम ट्रस्ट, वांगणी, जि. ठाणे**

## नोटीस

**नमुना एन डी**
**(नियम ९२(३) पहा)**
लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH46/2327B2015मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46C2181 याचं तारीख 24/11/2024 रोजी निधन झाले आहे.
**मी सौ .**
**ज्योती सुरेश माने**
माने सुरेश,वॉर्ड न 1, एम आई डी सी रोड लक्ष्मी नगर, ता आष्टी बीड,महाराष्ट्र 414203.
उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.
याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.
**उत्तरआधिकारचे नाव-**
**ज्योती सुरेश माने**
**माने सुरेश, वॉर्ड न.1, एम आई डी सी रोड , लक्ष्मी नगर, ता आष्टी,बीड, महाराष्ट्र,414203.**

## नोटीस

**नमुना एन डी**
**(नियम ९२(३) पहा)**
लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH/46/CC/AUTO/2019/4767 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46BD7687 याचं तारीख 18/11/2023रोजी निधन झाले आहे.
**मी सौ .**
**अनिता अनंत माळी**
घर न-493,प्राथमिक शाळेजवळ,सावळा मार्ग, मु.कसलखंड, ता .पनवेल, जि .रायगड 410206.
उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.
याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.
**उत्तरआधिकारचे नाव-**
**अनिता अनंत माळी**
**घर न-493,प्राथमिक शाळेजवळ, सावळा मार्ग, मु .कसलखंड, ता.पनवेल. जि. रायगड,महाराष्ट्र,410206.**



# समाजाला प्रकाश झोतात आणणारे व ओ.बी.सी नेते,आदर्शयुवा उद्योजक मा.श्री. नामदेवराव आयलवाड यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा संपन्न.

## सोहळ्यास हितचिंतकाची झाली होती मांदीआळी..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनीधी /माधव काईतवाड बोरगडीकर**

**नांदेड-** जिल्हातील भोकर तालुक्यातील डौर या गावात एका शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले. त्यांचा 42 वर्षांचा जिवन प्रवास हा खुप खडतर अतिशय मेहनती व संघर्षमय होता. याच खडतर जिवनात आपण समाजाचे काही देणे लागतो हा उद्देश डोळ्यासमोर ठेवुन त्यांनी समाज सेवेचा प्रण घेवुन समाज हित कार्यास सुरुवात केली व ते समाजकार्यातुन ज्या समाजाची ओळख जगासमोर नव्हती.अंधारात असलेला समाज म्हणजे गोल्ला गोल्लेवार गोलकर यादव समाज. या समाजाला जगासमोर हि एक आमची जात आहे हे दाखवुन देण्यासाठी दिवस रात्र एक करुन मेहनत घेतली व समाजाच्या संघटना भक्कमपणे उभारणी साठी पुढे येऊन त्यांनी संघटना स्थापन केल्या. त्याचेच फळ समाजाला भेटले व समाज हा अंधार मुक्त झाला. समाजाला ओळख निर्माण झाली, समाज कार्य करत करत ते शेतकरी ते एक आदर्श युवा उद्योजक व आठरा पगड जातीचे म्हणजे ओ.बी. सी नेते हा त्यांचा जिवन प्रवास.. नामदेवराव आयलवाड यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा हा विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भोकर शहरातील गडावरील महादेवाचा दुग्ध अभिषेक करुन माझ्या सामान्य जनतेला हे वर्ष सुख समृद्धी व निरोगी जावो असे साकडे घातले.त्यानंतर



शाळेत मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. त्यांनतर भोकर शहरात आयलवाड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी समाजातील आणि विविध क्षेत्रातील हितचिंतकांची मोठे मोठे हार ,केक ,पेढे घेवुन रीघ लागली होती. विधान परिषद आमदार मा श्री अमरभाऊ राजुरकर यांनी नामदेवराव साहेबांना घरी निमंत्रित करून त्यांच्या निवासस्थानी यथोचित सन्मान करुन वाढदिवस साजरा केला त्यानंतर त्यांचे नांदेड येथील व्यवसायिक कार्यालयात वाढदिवस शुभेच्छा देण्यासाठी रात्री उशिरापर्यंत राजकीय,शैक्षणीक ,सामाजिक व्यवसायिक ई क्षेत्रातील मित्र मंडळींनी गर्दी केली होती , अखिल भारतीय यादव महासभेचे राष्ट्रीय महासचिव श्री बिशनकुमार यादव यांनी नामदेवराव आयलवाड साहेब यांना घरी निमंत्रित करून यादव गवळी समाज बांधवांच्या वतीने यथोचित सन्मान सत्कार करुन वाढदिवस साजरा केला. शेवटी ज्येष्ठ समाज बांधव श्री जगन्नाथ येईलवाड साहेब यांच्या घरी नामदेवरावांना ओवाळणी करून वाढदिवसानिमित्त आशिर्वाद दिला.

यावेळी त्यांच्या सोबत संपूर्ण वेळ गोल्ला गोल्लेवार गोलकर यादव समाजातील पदाधिकारी व लहान थोर आणि युवा वर्ग उपस्थित होते यामध्ये गोल्ला गोल्लेवार गोलकर यादव समाजातील ज्येष्ठ समाजबांधव श्री राजन्नाजी आटपलवाड , श्री अरुण पाटील साहेब,श्री बि के पाटील कोटेकलूरकर, श्री बालाजी नांदेडेसर, समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री संजय आऊलवार, समाज संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष श्री कृष्णराव चिंतलवार, श्री तुकाराम रामनबैनवाडसर, कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री रवींद्र बंडेवार सर, जिल्हा उपाध्यक्ष श्री हनुमंत काऊलवार सर, श्री सटवाजी करेवाड साहेब, श्री विलास रोकमवारसर,

श्री राजेश मट्टमवार सर,श्री शिवकुमार पाटील, श्री अंबादास आटपलवाडसर, श्री बाबुराव माडगे सर, श्री सचिन कोंके, श्री माधव बैनवाड सर, श्री बालाजी जुरावाडसर, श्री गणेश नलगोंडे साहेब, श्री सहदेव दोसलवार साहेब, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख श्री सटवाजी मोदलवाड, नांदेड दक्षिण तालुकाध्यक्ष श्री गोविंद कोंके, श्री गजुभाऊ आयलवाड,महानगर युवा संघटनेचे पदाधिकारी श्री संदीप जिल्हेवाड, श्री संतोष दासरवार,श्री गोपी पुपलवाड, श्री प्रमोद जकुलवार,श्री प्रमोद अटकेलवार, श्री मनोज आऊलवार, श्री कालिदास जंगिलवाड, श्री बंडु देगुरे, श्री गजानन पेनलोड, श्री माधव काईतवाड, श्री झंपलवाड थेरबनकर, श्री बालाजी अनंतवार, श्री गणेश यादव, श्री नरसिंग चिंतलवार, श्री दत्तात्रेय चिंतलवार, श्री श्रीनीवास आटलावार, श्री ओंकार आटलावार, श्री गजानन जकुलवार ,

श्री प्रविण आटकेलवार, श्री अमोल आटपलवाड, श्री रवि शिरगे,सह अन्य मान्यवर उपस्थित होते.

---

## आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा

### सरकारने रब्बी धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवले

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड**
**प्रतिनिधी गोंदिया**



**गोंदिया,** 7 जुलै : 2025-26 रब्बी हंगामात गोंदिया जिल्ह्यात भाताचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले असून, याची खरेदी महाराष्ट्र विपणन महासंघ आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून खरेदी केंद्रांवर करण्यात येते. खासगी बाजारात धानाला कमी किंमत मिळत असल्याने, 2025-26 रब्बी हंगामात धान उत्पादक शेतकरी विपणन महासंघ आणि आदिवासी विकास महामंडळाच्या खरेदी केंद्रांवर मोठ्या प्रमाणात धान विक्रीसाठी आणत आहेत. मात्र, 2025-26 रब्बी हंगामासाठी गोंदिया जिल्ह्यासाठी ठरवलेले धान खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने अनेक धान उत्पादक शेतकरी धान विक्रीपासून वंचित राहिले आहेत. खरेदी केंद्रांवर आणलेले धान केंद्राबाहेर पडून आहे आणि पावसात भिजत आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली असून, त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीची भीती आहे. शेतकऱ्यांच्या या गंभीर समस्येकडे प्राधान्याने लक्ष देऊन, गोंदिया जिल्ह्याच्या प्रश्नांना आघाडीवर ठेवून सोडवण्यासाठी कटिबद्ध असणारे आमदार विनोद अग्रवाल यांनी 3 जुलै रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन केंद्र सरकारकडून उद्दिष्ट वाढीचा निर्णय येईपर्यंत राज्य सरकारमार्फत शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी केली होती. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार विनोद अग्रवाल यांच्या या मागणीचा विचार करून शेतकऱ्यांच्या हितासाठी रब्बी हंगामाच्या भात खरेदीचे उद्दिष्ट वाढवण्यास मान्यता दिली आहे. लवकरच यासंदर्भातील आदेशपत्र जिल्ह्याला प्राप्त होईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने घेतलेल्या या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल गोंदिया जिल्ह्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांनी सरकार आणि आमदार विनोद अग्रवाल यांचे आभार मानले आहेत.

---

## कालिका देवी मंदिरात पांडुरंगाच्या भक्तीत लीन झाले नाशिककर

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**





आषाढी एकादशीच्या निमित्ताने नाशिकचे ग्रामदैवत श्री कालिका देवी मंदिरात सुप्रसिद्ध गायक व बासरी वादक राजेंद्र भदाणे प्रस्तुत *जय हरी विठ्ठल* हा भक्ती गीतांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. "प्रथम तुला वंदितो" या अतिशय सुंदर बासरी वादनाने या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली . विठू माऊली तू,देव देव्हाऱ्यात नाही, विठ्ठल आवडी प्रेमभाव, सुंदरते ध्यान, देवाचिये द्वारी, विठ्ठल नामाची शाळा भरली, श्याम तेरी बंसी, अबीर गुलाल, टाळ बोले चिपळीला, सावळ्या विठ्ठला, कानडा राजा पंढरीचा, आई भवानी, माझी रेणुका माऊली, यमुनेच्या तीरी काल पाहिला हरी, असे भजन गात "मै धरू तिहार ध्यान" या भैरवी रागातील भक्ती गीताने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी राजेंद्र भदाणे, माऊली मुळे, अश्विनी सरदेशमुख, भाग्यश्री गायधनी, सीमा जाधव, दीपकजी चौधरी या गायक गायिकांनी सुमधुर भक्ती गीते सादर करत उपस्थित भाविकांचे मने जिंकली. ध्वनी व लाईट संयोजन सुरेश कापरे यांचे होते. श्री कालिका देवी संस्थानच्या वतीने सर्व कलाकारांचा सत्कार करण्यात आला. मुख्य गायक राजेंद्र भदाणे व उपस्थितांच्या हस्ते पांडुरंगाची आरती करण्यात आली.. यावेळी संस्थांनचे अध्यक्ष केशवराव अण्णा पाटील, सुभाष तळाजिया, राजेंद्र शेळके, दत्ता पाटील, नितीन लोणारी, पांडुरंग माढोकर, सुरेंद्र पाटील, डॉक्टर प्रतापराव कोठावळे, किशोर कोठावळे, आबासाहेब पवार, संतोष कोठावळे,भरत पाटील, विशाल पवार, मंदिराचे मुख्य पुजारी पुराणीक गुरुजी हे उपस्थित होते. संस्थांनच्यावतीने दर्शनाला येणाऱ्या भाविकांसाठी दिवसभर खिचडी आणि केळी चा प्रसाद वाटप सुरू होते.

---

## "शिक्षणाची वारी विठ्ठलाच्या दारी" विठ्ठलनामाच्या जयघोषात निघाली नवनिर्माण शाळेची शिक्षण वारी...

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत पाटोदा शहरातील नवनिर्माण प्राथमिक शाळा, लाल हनुमान मंदिर क्रांतीनगर महासांगवी रोड, पाटोदा या शाळेची "शिक्षणाची वारी विठ्ठलाच्या दारी" विठ्ठल नामाच्या जयघोषात संपन्न झाली. ग्यानबा तुकाराम शिक्षणातच खरा राम, राम कृष्ण हरी शिक्षण आले आपल्या दारी असा जयघोष करीत पाटोदा शहरातून नवनिर्माणची शिक्षण वारी निघाली. या शिक्षण वारीने पाटोदा शहर वासियांचे लक्ष वेधून घेतले. विठ्ठल रुक्मिणी व वारकऱ्यांच्या वेशभूषेत, टाळ चिपळ्यांच्या व हलगीच्या तालावर पाटोदा शहर चिमुकल्यांनी दणाणून सोडले. त्या नंतर शाळेच्या प्रांगणामध्ये रिंगण करून माऊली माऊली च्या गीतावर व टाळ हाती घेऊन सुंदर असे नृत्य सादर केले. सदर कार्यक्रमास प्रगती शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव सौ.सत्यभामाताई बांगर, व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ.विजयाताई जायभाय तसेच समाजातील अनेक प्रतिष्ठित नागरिक व पालक उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री.



पठाण एन.जी.यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती बांगर के.एन., श्रीमती बडे सी.यु., श्री.जायभाय ए.एम., श्री.डोके एस.एस., श्री.खाडे ए.पी., श्री.बांगर बी.एस., श्री.रंधवे सर यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. वारीचा शेवट फराळ देऊन करण्यात आला.

---

## श्रीमती पारूबाई हिलाल यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**
**रघुनाथ देवकर**



पंढरपूर तालुक्यातील खर्डी येथील श्रीमती पारूबाई गणपत हिलाल(८४वर्षे) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजतात त्यांचे नातेवाईक, आप्तस्वकीय, पाहुणेरावळे, सगेसोयरे व ग्रामस्थ यांनी त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे राहते घरी बहु गर्दी केली. त्यांचा स्वभाव मनमिळावू असल्यामुळे त्या समाजामध्ये लोकप्रिय असल्याचे बोलले जाते .त्यांच्या दुःखद निधनाने हिलाल परिवारामध्ये मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. त्यांच्या अंत्ययात्रेत समाजातील सर्व घटकांचा समावेश होता.

---

# आझाद मैदानात कक्कय्या समाजाचा जनसागर लोटला,धरणे आंदोलनाला सर्वपक्षीय पाठिंबा!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (दत्ता खंदारे /प्रतिनिधी )**

संत कक्कय्या समाजाला स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी आझाद मैदानात ७जुलै रोजी कक्कय्या(ढोर) समाजाचे एकदिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले होते. यावेळी आझाद मैदानात कक्कय्या (ढोर )समाजाचा मोठा जनसागर लोटला होता.संत कक्कय्या नावाच्या टोप्या समाज बांधवानी परिधान केल्या होत्या." कोण म्हणतो देणार नाय, घेतल्या शिवाय राहणार नाय" "महामंडळ आमच्या हक्काचे"अशा विविध घोषणानी आझाद मैदान दणानून गेले होते.

मुंबई ठाणे, पुणे, नाशिक, जालना,औरंगाबाद, बीड, परभणी,नांदेड,मिरज,सांगली,सातारा,कोल्हापूर ,सोला पूर, लातूर अशा वेग वेगळ्या जिल्हातून कक्कय्या बांधव हजारोच्या संख्यने आर्थिक विकास महामंडळ मिळावे म्हूणन आझाद मैदानात दाखल झाले होते.

वीरशैव कक्कया कल्याण मंडळ मुंबई, हि संस्था कक्कया ढोर जात अनुसूचित जाती तील एक घटक आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेला समाजाला वंचित घटकाना आर्थिक सहाय्यता मिळावी, स्वयं रोजगार साठी मदत मिळावी म्हणून संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ या नावाने स्वतंत्र शासकीय महामंडळ निर्माण करावे या मागणीसाठी, हे मंडळ मागील चार वर्षा पासुन शासन दरबारी प्रयत्न करीत आहे.

मागील वर्षी एकदिवसीय राज्यव्यापी



धरणे अंदोलन २८ जून २०२४ रोजी आझाद मैदान येथे धरणे करण्यात आले. त्यावेळी तत्कालीन आमदार ज्ञानराज चौगुले आणि इतर लोक प्रतिनिधी ह्यांच्या एकत्रित प्रयत्नामुळे, मागील वर्षी तत्कालीन मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांनी मागील वर्षी पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ देतो अशी घोषणा केली, परंतु शासन निर्णय अखेर निघाला नाही,मंडळाचे पदाधिकारी यांनी वर्षभर पाठपुरावा केला तरी काहीच उपयोग झाला नाही.४जुलै २०२५रोजी मा श्री संजयजी शिरसाट साहेब सामाजिक न्याय मंत्री यांची विधान भवन येथे प्रत्यक्ष भेट घेतली असता बैठक लावतो असे आश्वासन दिले.परंतु आज अखेर काहीच झाले नाही.समाज प्रचंड नाराज झाला असून त्यामुळेच दुसरे राज्यव्यापी धरणे अंदोलन ७ जुलै २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे करण्यात आले.

यावेळी धरणे आंदोलनाला सर्वपक्षीय नेत्यांनी उपस्थित राहून धरणे आंदोलनाला पाठींबा दिला.

यावेळी काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड,शिवसेना माजी खासदार राहूल शेवाळे, काँग्रेस आमदार ज्योती गायकवाड, यशोमती ठाकूर,महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी नगरसेवक वसंत नकाशे,धारावी विधानसभा संघटक विठ्ठल पवार यांनी आंदोलनस्थळी उपस्थित कक्कय्या समाजाला पाठिंबा दिला.

सरते शेवटी वीरशैव कक्कया कल्याण मंडळ मुंबई यांच्या पदाधिकाऱ्यांना विधानभवन भवनात सामाजिक मंत्री संजय शिरसाट यांनी भेट दिली आणि अधिवेशन संपेपर्यंत संत कक्कय्या समाजाला स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ देण्याची घोषणा करण्याचा प्रयत्न करतो असे आश्वासन दिले.

---

# राहुल जाधव यांची राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी फेर निवडी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा.हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या आदेशानुसार पाटोदा तालुका राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी निवड फेर निवड करण्यात आली. काग्रेसचे माजी मंत्री अशोकराव पाटील, आदित्य पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केज येथील पक्षाच्या बैठकीत निवड करुन नियुक्ती पत्र दिले आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष आदरणीय मलिकार्जुन खर्गे, देशाच्या नेत्या आदरणीय सोनियाजी गांधी, देशाचे विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री. राहुलजी गांधी, अखिल भारतीय कॉंग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा



हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ.रजनीताई पाटील, महाराष्टाचे प्रभारी श्री.रमेश चेन्नीथलाजी, बीड जिल्हा प्रभारी मा. श्री.देविदासजी भन्साळी हे विद्यमान भाजप सरकारच्या जातीय व धार्मिक तेड निर्माण करणाऱ्या धोरणावर तसेच सर्व सामान्य जनतेला भेडवसावण्याऱ्या महागाई आणि भ्रष्टाचार या सारख्या गंभीर विषयावर जागरुकता निर्माण करण्यासाठी व धर्मनिरपेक्ष आणि सर्व समावेशक विकास देणारे काँग्रेस सरकार राज्यात व देशात आणण्यासाठी काँग्रेसच्या मार्फत पक्षाला बळकटी देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे व सर्वांचे लाडके नेते अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आदरणीय मल्लीकार्जुन खर्गे, देशाच्या नेत्या आदरणीय सोनियाजी गांधी, व आपले सर्वांचे लाडके नेते देशाचे विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री.खासदार राहुलजी गांधी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा.हर्षवर्धन सपकाळ साहेब, अखिल भारतीय काँग्रेस कार्य समितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकरावजी पाटील साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला सर्वसामान्यांना हक्काचे व्यासपीठ निर्माण करण्यासाठी पाटोदा तालुका राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी पाटोदा येथील राहुल शाहुराव जाधव यांची फेर निवड करण्यात आली.

---

## उमरी तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने लक्ष्मन हाके याचा निषेध

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



नांदेड - उमरी तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष अजितदादा गटाच्या वतीने आज उमरी तहसील कार्यालय समोर वाचाळ वीर, लक्ष्मण हाके, यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस चे राष्ट्रीय अध्यक्ष, आजीत दादा, यांच्या विरुद्ध बेताल खालच्या पातळीवर वक्तव्य केले त्याचा लक्ष्मण हाके यांच्या प्रतिमेला जोडे मारुन निषेध व्यक्त केला व अशा प्रवृती विरुद्ध कडक कार्यवाही करावी व महाराष्ट्रात मोठ्या नेत्यांना शिव्या देऊन राजकारणात मोठ होऊ पाहणाऱ्या प्रवृती च्या विरुद्ध कठोरात कठोर कार्यवाही करावी अशा आशयचे निवेदन उमरी तहसीलदारा मार्फत मुख्यमंत्री तथा राज्याचे गृह मंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले या प्रसंगी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षांचे प्रदेश सरचिटणीस डॉ विक्रम देशमूख, तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर कदम, तालुका कार्याध्यक्ष दत्ताहरी पाटील, संतोष वाघमारे, एस के शेख, महिला तालुका अध्यक्ष सौ अनिता अनंतवार,श्रीनिवास अनंतवार, शहर अध्यक्ष लक्ष्मीबाई जयस्वाल, सुरेखाताई गोकावार, तालुका उपाध्यक्ष बालाजी शिंदे, शंकराव पा थेटे, संदिप शिंदे पाटील, रावसाहेब वडजे, जिल्हा संघटक सचिव सय्यद जफर, अल्पसंख्यांक जिल्हा संघटक शेख रियाज, शहर अध्यक्ष महेश पडोळे, मनोज लाडके, साईनाथ अक्कमवाड बितनाळकर, वो बी सी तालुका अध्यक्ष हावगीर पाटील, सामाजिक न्याय तालुका अध्यक्ष साहेबराव गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष् रमेश हैबते बाबू दांडेवाड, इ सह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते

## ई-सिगारेट विक्री तसेच जवळ बाळगणाऱ्यांवर होणार कायदेशीर कारवाई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

राज्यात ई-सिगारेटच्या विक्रीवर बंदी आणण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे केली. त्या अनुषंगाने ई-सिगारेट विक्री करणाऱ्यावर तसेच जवळ बाळगणाऱ्यांवर "इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध अधिनियम २०१९" अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी स्वरूपात दिले. राज्य शासनाने सन २०१९ मध्ये ई-सिगारेटची विक्री, साठवणूक आणि जाहिरातीवर बंदी घातली असताना सुद्धा राज्यात मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी ई-सिगारेटची विक्री होत असल्याचे मे २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे. ई-सिगारेटची विक्री व जाहिरातींमुळे मोठ्या प्रमाणात विशेषतः विद्यार्थी, युवती व युवकांमध्ये व्यसनांचे प्रमाण वाढून त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे, या प्रकरणांकडे संबंधित अधिकाऱ्यांचे योग्य नियोजनाअभावी दुर्लक्ष होत असून, या प्रकरणी शासनाने चौकशी करून ई-सिगारेटच्या विक्रीला आळा बसविण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, राज्यात विना धूर ई-सिगारेटबाबत "इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, साठा आणि जाहिरात) अधिनियम, २०१९" या कायद्यानुसार कारवाई करण्यात येते. सदर कायद्यांतर्गत राज्यात मे २०२५ मध्ये मुंबई शहर, नागपूर शहर, पिंपरी-चिंचवड व ठाणे शहर या पोलीस आयुक्तालयांतर्गत एकूण ११ गुन्हे दाखल असून १५.४७ लक्ष रुपये इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अधिनियमातील कलम ४ व ५ मधील तरतूदीनुसार ई-सिगारेटच्या उत्पादन, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक व जाहिरातीवर बंदी घालण्यात आली आहे. ई-सिगारेटला आळा बसविण्याकरीता विविध कार्यक्रमांचे तसेच पथनाट्यांचे आयोजन करण्यात येऊन त्याद्वारे ई-सिगारेटमुळे आरोग्यास होणाऱ्या नुकसानीबाबत राज्यातील नागरीकांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच, शाळा व महाविद्यालयात प्रत्यक्ष भेटी देऊन पोलीस दिदी, पोलीस अधिकारी यांच्यामार्फत ई-सिगारेट व्यसनांपासून होणाऱ्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच मोहल्ला कमिटी, पोलीस मित्र, आईज अँण्ड इअर यांच्या सभासदांसमवेत पोलीस ठाणे स्तरावर वेळोवेळी याबाबत बैठका आयोजित करण्यात येतात. सदर कायद्यांतर्गत राज्यात सन २०२१ ते २०२५ (मे अखेरपर्यंत) या कालावधीत एकूण २४७ गुन्हे दाखल असून सुमारे ४ कोटी ३३ लक्ष इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
तसेच भविष्यात राज्यातील विविध पोलीस घटकांतर्गत विविध पोलीस ठाणे हद्दीत ई-सिगारेट विक्री करताना, जवळ बाळगताना मिळून आल्यास "इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, साठा आणि जाहिरात) अधिनियम, २०१९" अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## दलित पॅंथरच्या हिमायतनगर तालुका अध्यक्षपदी विजय वाठोरे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनीधी (माधव काईतवाड बोरगडीकर**



**नांदेड** - हिमायतनगर तालुक्यातील मौजे सरसम (बु) येथील युवा पत्रकार, विद्रोही साहित्यिक, जणसामान्य,गोरगरीब,वंचित बहुजनांच्या समस्या पोटतिडकीने मांडून न्याय मिळवून देण्यासाठी धडपडणारे पत्रकार विजय नारायण वाठोरे यांची पद्मश्री नामदेव ढसाळ यांनी संस्थापित केलेल्या,सामाजिक न्यायासाठी, समानतेसाठी व दलित हक्कासाठी कार्य करणाऱ्या ' दलित पॅंथर ' या संघटनेच्या हिमायतनगर तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष बुद्धभूषण गोटे यांनी नियुक्ती पत्र देत पत्रकार वाठोरे यांच्या पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत तालुका अध्यक्ष पदाची धुरा त्यांच्यावर सोपवली आहे.या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे. निवड झाल्याबद्दल जेष्ठ पत्रकार गंगाधर वाघमारे, त्रिरत्नकुमार भवरे,कानबा पोपलवार, पाशा खतीब,दाऊ गाडगेवाड,रमेश पंडित, विष्णू जाधव,माधव काईतवाड,गंगाधर गायकवाड,से. नि. मुख्याध्यापक संघपाल वाठोरे,सहशिक्षिका बेबीनंदा सोनवणे,कालिंदा नारायण वाठोरे,चंद्रमनी वाठोरे,,डॉ.संदेश नांदेडकर,मुंबई हायकोर्टाचे क्लार्क सुमेध वाठोरे,राजरतन वाठोरे, लंकेश वाठोरे, संघप्रिया कवडे, कपिल वाठोरे,मिर्झा सर यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# म्हशीचे बछडे घेऊन जाणारा कंटेनर ट्रक वडकी पोलिसांनी केला जप्त

### ५५ बछड्यांची सुटका २७ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**वडकी:-** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरून म्हशीचे बछडे घेऊन जाणारा कंटेनर ट्रक जप्त करून ५५ बछड्यांची पोलिसांनी सुटका केली असून म्हशीच्या बछड्या सह २७ लाख ७५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे ही कारवाई वडकी पोलिसांनी शनिवारी मध्यरात्रीच्या दीड वाजताच्या दरम्यान वडकी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील देवदरी घाटात केली आहे. नागपूरवरून तेलंगणा राज्यात कत्तलिसाठी घेऊन जात असल्याची गोपनीय माहिती पेट्रोलिंग दरम्यान वडकी पोलिसांना मिळाली या माहितीच्या आधारे पोलिसांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर देवधरी घाटात सापळा रचला दरम्यान नागपूरकडून




म्हशीचे बछडे घेऊन येणाऱ्या एच आर ६७ सी २००५ या क्रमांकाच्या कंटेनर ट्रकची पोलिसांनी तपासणी केली असता त्यामध्ये म्हशीचे बछडे दोरखंडाने बांधलेले दिसले पोलिसांनी कंटेनर ट्रक जप्त करून सर्व बछड्यांची गोरक्षण संस्थेत रवानगी केली व यातील आरोपी इस्तफबाल तोशीन ३१ वर्ष राहणार हुशणाबाद जिल्हा मुजफ्फरनगर साधन शफी







वय २० वर्ष राहणार किटीपुरा जिल्हा बागपळ काशिम अब्दुल गप्पार वय २३ वर्ष राहणार बागपळ सद्दाम अब्दुल गप्पार ३५ वर्ष राहणार बागपळ जब्बार अफ्रार वय ४० वर्ष राहणार मुज्जफर नगर या सर्व आरोपी विरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अंतर्गत वडकी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून या कारवाईत पोलिसांनी ५५ म्हशीचे बछडे प्रत्येकी किंमत ५ हजार रुपये एकूण २ लाख ७५ हजार रुपये कंटेनर किंमत २५ लाख रुपये असा एकूण २७ लाख ७५ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता अप्पर पोलीस अधीक्षक पियूष जगताप उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनात वडकी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुखदेव भोरकडे पोलीस कर्मचारी भोजराज करपते विनोद मोतेराव निलेश वाढई, वाहन चालक अमीर कीन्नाके यांनी केली आहे.

## आषाढीनिमित्त अजिंठा येथील विद्यालयात चिमुकल्यांनी खांद्यावर पताका घेत, वेशभूषा सादर करत काढली दिंडी..!-




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश पालोदकर**
**सिल्लोड तालुका प्रतिनिधी**

**सिल्लोड** :- तालुक्यातील अजिंठा येथील माणिकराव पालोदकर इंग्लिश स्कूल आणि महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त 5 जुलै वार शनिवार रोजी विद्यार्थी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून वारकरी व सांप्रदायिक महोत्सवाचे महत्व विशद केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संतांच्या आकर्षक वेशभूषा करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर चिमुकले बाल गोपाळ यांनी विठ्ठल नामाचा जप करीत संपूर्ण परिसर भक्ती-मय केला होता. विठ्ठल नामाच्या जपा बरोबरच विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण विषयी जनजागृती केली. लोभापासून विभक्त असलेल्या घटक म्हणजेच वारकरी. या पाई दिंडीतून जनजागृतीद्वारे विद्यार्थी मनावर सांप्रदायिक बाबी प्रतिबिंबित करण्याचे कार्य दिंडी सोहळ्यातून शाळेच्या वतीने राबविले. यावेळी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन पालोदकर ,माध्यमिक विभागाचे जेष्ठ शिक्षक शांतीलाल झेलवार, काकासाहेब पाटील,संजय पायगन, भाऊसाहेब जंगले, लोकेश पालोदकर, पी. जी. पालोदकर, देवेंद्र तायडे, अनंत बुलबुले, गोपीनाथ डापके एकनाथ जंजाळ, दर्शन मंडावरे विलास जाधव, परदेशी मॅडम ,सूर्यवंशी, दिनेश दसरे ,
विजय पवार बोरसे मामा आदींनी परिश्रम घेतले.

# खारघर परिसरातील दारूबंदीचे निवेदन प्राप्त झाल्यास

### योग्य ती कार्यवाही करणार - उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल :

खारघर परिसरात प्रभागाकरिता दारूबंदी करण्याबाबत विहित प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत विधानसभा सदस्य प्रशांत ठाकूर यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभेत बोलत होते. सन २००८ व २००९ च्या अधिसूचनेनुसार नगरपरिषद / महानगरपालिका क्षेत्रातील एखाद्या प्रभागातील २५ टक्के पेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण मतदारांनी लेखी निवेदन दिल्यास संबंधित जिल्हाधिकारी यथास्थिती गुप्त पद्धतीने मतदान घेण्याची प्रक्रिया पूर्ण करतील. जर संबंधित प्रभागातील एकूण मतदार किंवा महिला मतदारांच्या संख्येच्या किमान 50 टक्केपेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदार यांनी मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मतदान केल्यास त्या क्षेत्रात मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येतात, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.



उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ग्रामपंचायतीचे नगरपालिकेत किंवा महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर अनुज्ञप्ती संदर्भात कोणती कार्यवाही करावी यासंदर्भात शासनाने वेळोवेळी नियमांमध्ये बदल केले आहेत. 1972 पासून राज्यात नवीन अनुज्ञप्तीची परवानगी देण्यात येत नाही. तथापि, विहित कार्यपद्धतीनुसार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्यास परवानगी देण्यात येते. मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्यासंदर्भात नगरपालिका किंवा महानगरपालिकेतील उपस्थित नागरिकांच्या नव्हे तर एकूण मतदारांच्या 50 टक्के पेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदारांचा निर्णय विचारात घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभा सदस्य अभिमन्यू पवार यांनी उपस्थित केलेल्या मुद्यास उत्तर देताना स्पष्ट केले.

## जिल्हा रूग्णालयात धोकादायक अपघात: चालू सिलिंग फॅन रुग्णावर पडला, मनसेने घेतली तात्काळ दखल!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

आज दिनांक ७ जुलै २०२५ रोजी जिल्हा रूग्णालय, अलिबाग येथील दुसऱ्या मजल्यावरील वार्डमध्ये एक गंभीर अपघात टळल्याची घटना घडली. चालू स्थितीत असलेला सिलिंग फॅन अचानक रुग्णाच्या अंगावर कोसळला. मात्र सुदैवाने फॅनची पाती रुग्णाच्या शरिराऐवजी रक्ताची बॅग लावलेल्या स्टॅन्डला लागल्यामुळे फॅन एकीकडे झटकून पडला आणि मोठा अनर्थ टळला.हा अपघात हमरापूर (ता. पेण) येथील एका रुग्णाच्या बाबतीत घडला



असून रुग्णाच्या रक्ताच्या बॅगेतील रक्त सर्वत्र सांडलेले होते.घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे देवव्रत विष्णू पाटील व कल्पेश चवरकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि संपूर्ण परिस्थितीची पाहणी केली. रुग्णाची विचारपूस करून रुग्णालयातील व्यवस्थेच्या गंभीर हलगर्जीपणावर त्यांनी संताप व्यक्त केला.यानंतर मनसेचे देवव्रत पाटील मनसे, शॅडो कॅबिनेट सदस्य आणि सिद्धू म्हात्रे अलिबाग अध्यक्ष यांनी थेट प्रभारी शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांची भेट घेऊन प्रश्न विचारले. मात्र, डॉ. पाटील यांनी "निधी नाही", "पालकमंत्री नाहीत", "PWD च्या अधिकाऱ्यांना बोलावतो" अशी बिनबुडाची कारणे देत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप मनसेने केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ठाम भूमिका:मनसेने या गंभीर अपघाताची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. "अशी दुर्घटना पुन्हा होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाने तत्काळ उपाययोजना कराव्यात," असा इशारा मनसेने दिला आहे.सामाजिक जबाबदारीत आघाडीवर मनसे या प्रसंगातून पुन्हा एकदा मनसेची समाजाप्रती असलेली जागरूकता आणि तत्परता अधोरेखित झाली आहे. जिल्हा रुग्णालयासारख्या ठिकाणी रुग्णांच्या जीवाशी खेळ होतोय, आणि प्रशासकीय यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याने मनसेने पुन्हा एकदा रस्त्यावर उतरून जनतेसाठी आवाज उठवला आहे.

## राष्ट्रीय महामार्ग वडकी येथे भरधाव कारची दुभाजकाला धडक

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**वडकी:-** वडकी येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ हा अत्यंत महत्त्वाचा मानला जाणाऱ्या महामार्गावर अपघाताची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही.
या महामार्गावर दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण वाढले आहे. हैदराबाद येथून नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या एका स्विफ्ट डिझायर कारची दुभाजकाला जोराची धडक बसून भीषण अपघात झाला. ही घटना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर सोमवार दि ७ जुलै रोजी साडेदहाच्या दरम्यान वडकी उड्डाणपुलावर घडली.सुदैवाने या अपघातात कारची एअरबॅग खुलल्याने कुठलीही जीवितहानी झाली नसून मात्र चालकाला किरकोळ मार लागला आहे.हैद्राबाद येथील अदिल अहमद (३५) टी एस १३ ई जे ०६०१ या क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायर कारने नागपूरच्या दिशेने जात होते दरम्यान वडकी गावाजवळ असलेल्या उड्डाण पुलावर त्यांचे वाहनवरील नियंत्रण सुटल्याने कारने महामार्गालगत असलेल्या दुभाजकाला जोराची धडक दिली. सुदैवाने या अपघातात कारची एअरबॅग खुलल्याने कुठलीही




जीवितहानी झाली नाही मात्र कारचा समोरील भाग क्षतीग्रस्त होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले व कारचालक अदिल अहमद रा,हैद्राबाद यांना किरकोळ मार लागला आहे. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी महामार्गाची चमू त्वरित दाखल होऊन महामार्गावरील अपघातग्रस्त वाहन बाजूला केले व वाहतूक सुरळीत केली.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेफळ येथे आषाढी एकादशीनिमित्त "वृक्षदिंडी" वारी.

**-दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश पालोदकर**
**सिल्लोड तालुका प्रतिनिधी**

" श्रावणात मृदू पावसाची सर आणि हृदयात विठू माऊलीचा गजर "तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेफळ, केंद्र आमठाणा शाळेत आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थीरुपी वारकऱ्यांची वारी जणू साक्षात पंढरपूराची वारीच अवतरली. विद्यार्थ्यांनी साकारल्या संत ज्ञानेश्वर, निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, तुकाराम यांच्या वेशभूषा व विद्यार्थीरुपी वारकऱ्यांच्या रुपात पावले मंत्रमुग्ध झाली. आणि गजर झाला– "ज्ञानोबा-तुकाराम...." भगवे झेंडे, तुळशीच्या रोपांची पालखी, कळस व मृदंगाच्या गजरात निघालेली ही वारी, गावकऱ्यांच्या आणि पालकांच्या उपस्थितीत एक आध्यात्मिक सोहळा बनली. फुगड्यांच्या



फेऱ्या, नृत्यातील नाद आणि अभंगांच्या गूंजनांनी अवघा शालेय परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. दिंडीची सांगता शाळेच्या प्रांगणात झाली. यावेळी गावातील अबालवृद्ध, विद्यार्थी, माता, शिक्षकवृंद, यांनी संगीताच्या तालावर ठेका धरत फुगडी खेळण्याचा मनमुराद आनंद घेतला. अशा प्रकारे "वृक्ष दिंडीचे" समापन झाले. या "वृक्ष दिंडी" च्या वारीची तयारी सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे यशस्वी झाली. विशेष म्हणजे, याच वारीमध्ये विद्यार्थ्यांनी हातात छोटे रोपं, ओठांवर पर्यावरण गीत आणि अंतःकरणात हरित संकल्प, जिच्यात पर्यावरण संवर्धनाचा संदेश रुजलेला होता. याप्रसंगी "वृक्ष दिंडी" त शाळेच्या वतीने विविध प्रकारचे १५० वृक्ष "एक पेढ माँ के नाम" या उपक्रमांतर्गत शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने लागवडीचा आणि जतन करण्याचा दृढ संकल्प केला.
**"माऊली..माऊली..जय जय रामकृष्ण हरी,**

**निघाली**
**शाळेतून वारी, भक्तिभावाची नितांत खरी !"**
विठू नामाचा गजर करत, भक्तीच्या पावलांनी पुढे चालत राहूया ! साथ देऊ पर्यावरणाची, वृक्षलागवडीची, जीव सृष्टीची !विठ्ठल.. विठ्ठल..जय हरि विठ्ठल ! गजराने परिसर दुमदुमला होता. या वृक्ष दिंडीच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य शा.व्य.समिती शिंदेफळ, सरपंच,उपसरपंच,सदस्य ग्रामपंचायत शिंदेफळ, पोलीस पाटील, भजनी मंडळी, शिक्षण प्रेमी नागरिक, सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद जि.प.प्रा.शा.शिंदेफळ या सर्वांचे अनमोल सहकार्य मिळाले.

## पीडित कुटुंबीयांच्या पाठीशी आम्ही खंबीर उभे आहोत - मा.मंत्री रावसाहेब दानवे

### सारोळा, पिंपळदरी,मोढा येथील पीडित कुटुंबीयांची घेतली भेट

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील सारोळा येथील रोहित राजू काकडे व यश राजू काकडे, पिंपळदरी येथील शिवा सतीश गव्हाणे तसेच मोढा येथील शेतकरी महिला रंजना बापू शिंदे यांचा शेतात काम करत असताना वीज कोसळून अपघाती मृत्यू काही दिवसांपूर्वी झाला होता. त्याच पार्श्वभूमीवर आज मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.



अशा दुःखदायक प्रसंगी केंद्र व राज्य सरकार आपल्या परिवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे असा विश्वास त्यांनी दिला.यावेळी भाजपा प्रदेश चिटणीस तथा सिल्लोड सोयगाव विधानसभा नेते सुरेश बनकर,भाजपा अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रीसजी मुलतानी, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुनिल मिरकर, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना संचालक बाजीराव दाभाडे,भाजपा जिल्हा चिटणीस मेघराज चौंडीये, भाजपा शहर मंडळ अध्यक्ष मनोज आण्णा मोरेल्लु, भाजपा शिवना मंडळ तालुकाध्यक्ष आत्माराम पाडाळे,भाजपा भवन मंडळ तालुकाध्यक्ष एकनाथ हिवाळे, भाजपा अंधारी मंडळ तालुकाध्यक्ष नारायण खोमणे, भाजयुमो तालुकाध्यक्ष विजय वानखेडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.